www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

# दैनिक लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक २०८ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार, ०२ जानेवारी २०२५ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118



■ कल्याण शिधापत्रिका अधिकारी यांच्यावर सदोष...

पान ३ वर....



■ सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी करण्यास ६...

पान ३ वर....

# ठाण्यातील ३९ बांधकाम व्यावसायिकांना बजावली कारणे दाखवा नोटीस

## हवा प्रदूषण नियंत्रण नियमावलीचे पालन न केल्यास महापालिका देणार काम थांबवण्याचे आदेश

● ठाणे, रोहित जैसवाल :

ठाणे महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता राखण्यासाठी महापालिकेमार्फत विविध उपाय केले जात आहेत. त्यानुसार, महापालिकेने धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी एकूण २९७ बांधकाम व्यावसायिकांना हवा प्रदूषण नियंत्रण मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या नियमावलीचे पालन न करणाऱ्या ३९ बांधकाम व्यावसायिकांना कारणे दाखवा नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. त्यांनी नियमावलीचे तत्काळ पालन न केल्यास त्यांना तातडीने काम थांबण्याचे आदेश देण्यात येणार आहेत.



हवा प्रदूषण नियंत्रणासाठी असलेल्या नियमावलीचे पालन करण्याबाबत २९७ बांधकामांना प्राथमिक नोटीसा पाठवण्यात आल्या आहेत. त्यापैकी, ३१ जणांनी सर्व नियमावलीचे पालन केले आहे. तर, १५१ जणांकडे काही त्रुटी आढळल्याने त्यांना त्यांना सुमारे चार लाख रुपयांचा दंड आकारून अटींची पूर्तता करण्यास बजावण्यात आले आहे. तर, ३९ जणांनी नियमावलीची पूर्तता न केल्याने त्यांना बांधकाम का थांबवू नये, अशी विचारणा करणारी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेल्या व्यावसायिकांकडून तातडीने पूर्तता न झाल्यास तत्काळ काम थांबवण्याचे आदेश काढावेत, असे निर्देश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी दिले आहेत.

पान २ वर




## नौदलाच्या ताफ्यात येणार एकाच दिवशी तीन युद्धनौका

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

भारतीय नौदलाच्या ताफ्यात येत्या १५ जानेवारी रोजी 'निलगिरी', 'सुरत' आणि 'वागशीर' या तीन युद्धनौकांना सहभागी करून घेतले जाणार आहे. निलगिरी हे प्रोजेक्ट १७ए चे प्रमुख जहाज, शिवालिक-श्रेणीतील युद्धनौकांच्या तुलनेत एक मोठी प्रगती असून यामध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाद्वारे महत्त्वपूर्ण स्टेल्थ वैशिष्ट्ये आणि कमी रडार सिग्नेचर (रडारद्वारे लक्ष्य किती सहजपणे शोधले जाऊ शकते याचे एक माप) समाविष्ट आहेत. सुरत हे प्रोजेक्ट १५B विनाशक जहाज, कोलकाता-क्लास (प्रोजेक्ट १५ए) विनाशकांच्या फॉलो-ऑन क्लासचा चरम बिंदू आहे.

पान २ वर

## ⟨⟩ थोडक्यात ⟨⟩




### मुंबई होणार स्टार्ट अपची उपराजधानी

मुंबई : सेवा क्षेत्राची राजधानी मानल्या गेलेल्या मुंबईने स्टार्टअपमध्येही गती पकडण्यास सुरूवात केली आहे. देशातील सात मोठ्या शहरांच्या केलेल्या सर्वेक्षणामध्ये मुंबईने या क्षेत्रात दुसरा क्रमांक पटकावला असून शहरात ३६ नवे स्टार्टअप सुरू झाले आहेत. कर्नाटकची राजधानी बंगळुरूने पहिला क्रमांक अबाधित ठेवला आहे. या शहरांत ६६ नवे स्टार्टअप सुरू झाले आहेत. मुंबईत अव्हेन्यू सुपर मार्ट अर्थात डी-मार्ट ही सर्वात मोठी किमती कंपनी असून बंगळुरूमध्ये स्वीगी ही सर्वात मोठी स्टार्टअप कंपनी बनली आहे. सर्वांत कमी स्टार्टअप हैदराबादमध्ये ६ तर पुण्यात अवघे ७ स्टार्टअप सुरू झाले आहे. आरोग्य विमा कपंन्यांनी मोठी भरारी घेतली असून चेन्नईमध्ये स्टार हेल्थ तर नवी दिल्लीत मॅक्स हेल्थ केअर या सर्वांत मोठ्या कंपन्या बनल्या आहेत. तर गुरुग्राममध्ये ही जागा झोमॅटो या कंपनीने घेतली आहे.

### उपचाराच्या नावाखाली महिलेवर बलात्कार, भोंदू मांत्रिकाला अटक



वसई : मानसिक त्रास आणि पोटदुखीचा आजार बरा करतो असे सांगून एका महिलेवर बलात्कार करणाऱ्या भोंदू मांत्रिकाला विरार पोलिसांनी अटक केली आहे. उपचाराच्या नावाखालीं मंत्र आणि विधी करून त्या महिलेवर बलात्कार करून पैसे उकळले होते.

पीडित महिला ४५ वर्षांची असून पतीसह विरार पूर्वेच्या कारगिल नगर मध्ये राहते. या परिसरात रामपलट राजभर नावाच इसम मांत्रिकाचे काम करतो. पैशाचा पाऊस पाडणे, गुप्त घन शोधून देणे, भूत बाधा उतरवणे आदी दावे तो करत असतो. पीडित महिलेला पोटदुखीचा तसेच मानसिक त्रास होता. त्यामुळे ती या मांत्रिकाकडे उपचारासाठी जात होती. तिच्यावर तो मंत्रोच्चार आणि विधी करून उपचार करत होता. मे महिन्यात त्याने या महिलेला पाण्यात कोळसा टाकून पाणी पिण्यास दिले आणि त्यानंतर तिला गुंगी आली. यानंतर राजभर याने तिच्यावर बलात्कार केला.

# स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच गडचिरोलीच्या अतिदुर्गम भागात धावली बस! मुख्यमंत्र्यांचाही बसमधून प्रवास



● गडचिरोली, नितीन देवळेकर :

गडचिरोलीतील गर्देवाडा ते वांगेतुरी या अतिदुर्गम समजल्या जाणाऱ्या भागात स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच बससेवा सुरु करण्यात आली आहे. नवीन वर्षाच्या सुरुवातीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी या बसला हिरवा झेंडा दाखवत स्वत: बसमधून प्रवास केला.

याप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "आजचा दौरा हा विशेष आहे. अहेरी-गर्देवाडा या बससेवेचे उद्घाटन केले आहे. याठिकाणी ७५ वर्षांनंतर बससेवा सुरु झाली आहे. माओवाद्यांचे वर्चस्व असलेल्या भागांमध्ये आता आपले वर्चस्व निर्माण झाले आहे. लोकांनी सगळ्या प्रकारे माओवादाला नाकारले आहे. १२ गावांनी ठराव करून माओवाद्यांना राशन पाणी नाकारले. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यात एक नवीन पहाट तयार झाली आहे. गडचिरोली हे महाराष्ट्राचे प्रवेशद्वार असून शेवटचा नव्हे तर पहिला जिल्हा आहे. तसे परिवर्तन आम्ही सुरु केले आहे. कोनसरीचा प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन होत आहे. अनेक प्रकल्पांचे भूमिपूजन होत आहे. यातून १० हजार लोकांना रोजगार मिळाला असून १० महिन्यांमध्ये ५ हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. गडचिरोलीमध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन सुरु झाले आहे.

पान २ वर

# डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागात फेरीवाल्यांसाठी १५० मीटरची सीमारेषा

● डोंबिवली, प्रथमेश चव्हाण :

डोंबिवली – डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागातील फडके रस्ता, बाजीप्रभू चौक, इंदिरा चौक, पाटकर रस्ता, नेहरू रस्ता हे सर्वाधिक वर्दळीचे भाग म्हणून ओळखले जातात. या भागातील रस्ते, चौक वाहने, नागरिकांसाठी पूर्णपणे खुले असले पाहिजेत या विचारातून पालिकेच्या फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानकापासून १५० मीटर पर्यंत एक सीमारेषा आखून दिली आहे. या सीमारेषेच्या आत व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर कायदेशीर, दंडात्मक कारवाईचा बडगा उगारला जाणार आहे.

डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागातील फ, ग प्रभाग कार्यालयाकडून रेल्वे स्थानक परिसरातील फेरीवाले हटविण्याची मोहीम सकाळी नऊ ते रात्री दहा वाजेपर्यंत सुरू असते. मागील अनेक महिन्यांच्या कारवाईनंतर ग, फ प्रभाग हद्दीतील बहुतांशी फेरीवाले सततच्या कारवाईमुळे अन्य भागात व्यवसाय करण्यासाठी निघून गेले आहेत. काही फेरीवाले रेल्वे स्थानक भागातून हटण्यास तयार नाहीत.




आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी रेल्वे स्थानक परिसरातील रस्ते, चौक नागरिकांसाठी पूर्णपणे खुले पाहिजेत असे आदेश यापूर्वीच दिले आहेत.

पान २ वर

# महाराष्ट्रात क्रांती, पहिले एआय धोरण जाहीर होणार

## मंत्री आशिष शेलार यांनी घेतला आढावा



● मुंबई, यश सावंत :

सध्याच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात आता सॉफ्टवेअर आणि एआयचा काळ सुरु झाल्याचं पाहायला मिळत आहे. आयटी क्षेत्र ज्या झपाट्याने वाढलं, त्याच झपाट्याने आता या क्षेत्रात क्रांती होताना दिसून येते. त्यामध्ये डिजिटलायजेशनंतर आता आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने दिशादर्शक व्हावे यासाठी राज्याचे पहिले, एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) धोरण तयार करा, असे निर्देश माहिती व तंत्रज्ञान मंत्री ॲड आशिष शेलार यांनी आज विभागाला दिले. एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अधिक उद्योग, व्यवसाय उभे राहतील.

पान २ वर

### एआय मध्ये महाराष्ट्र अग्रेसर राहावा

दरम्यान, केंद्र सरकार जानेवारी २०२५ पासून वैयक्तिक नसलेल्या डेटासेट्सचे संकलन सुरू करणार आहे. त्यामुळे स्टार्टअप्स, कंपन्या, शैक्षणिक संस्था आणि संशोधका ॲप्स विकसित करण्यासाठी, विविध भाषांची सेवा देण्यासाठी तसेच आणि विशेष सेवा देण्यासाठी उपयोग होणार आहे. आपला देश तंत्रज्ञानाच्या आघाडीवर प्रगती करत असताना महाराष्ट्र यात अग्रेसर राहिला पाहिजे असेही ॲड. शेलार यावेळी म्हणाले. महाराष्ट्रातील बारामतीमध्ये एआयवर विकसित शेतीचा प्रयोग करण्यात आल्याचं पाहायला मिळालं. त्यामुळे, एआय हे तंत्रज्ञान वापरुन विविध क्षेत्रात बदल व क्रांती घडविली जाऊ शकते.

# नव्या वर्षात पनवेल - कर्जत रेल्वे धावणार

● नेरळ, भावना जैन :

नव्या वर्षात २०२५ मध्ये मुंबई उपनगरीय रेल्वे सेवेत पनवेल - कर्जत हा नवा कॉरिडॉर सामील होणार आहे. पनवेल कर्जत या नव्या कॉरिडॉरचे काम वेगाने सुरु आहे. या नव्या रेल्वे मार्गावर मुंबई महानगरातील सर्वाधिक लांबीचा बोगदा उभारला जात आहे. तर पनवेल कर्जत लोकल याच बोगद्यातून धावणार आहे.

पनवेल आणि कर्जत दोन रेल्वे स्थानक ही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस या रेल्वे स्थानकावरून दोन दिशेला असलेली शेवटची रेल्वे स्थानक आहेत. पनवेल हे मध्य रेल्वेच्या हार्बर मार्गावरील शेवटचे रेल्वे स्थानक आहे. तर, कर्जत हे मध्य रेल्वे मार्गावरील उपनगरीय रेल्वेचे शेवटचे स्थानक आहे. यामुळे पनवेलहून कर्जतला जायचे असेल तर ट्रान्स हार्बर मार्गाने ठाणे स्टेशनला येवून पुन्हा मध्य रेल्वेवरील लोकल पकडावी लागत असल्याने आता



नवीन कॉरिडोरमुळं पनवेल आणि कर्जतच्या मध्ये थेट रेल्वे केनक्टिव्हिटी मिळणार आहे. मुंबई अर्बन ट्रान्सपोर्ट प्रकल्पा अंतर्गत पनवेल कर्जत उपनगरीय रेल्वे कॉरिडोर उभारला जात आहे. जवळपास हा रेल्वे प्रकल्प २,७८२ कोटींचा नव्या रेल्वे मार्गाचा मेगा प्रोजेक्ट आहे.

पान २ वर

# दु:ख पचवून पुन्हा इरसाळवाडी झाली हसती-खेळती

● रायगड, विशाल पाटील :

**खालापूर तालुक्यात १९ जुलैला सर्वांचे हृदय हेलावणारी घटना घडली. रात्री झोपेत जोरदार पावसाच्या सरी कोसळत असताना डोंगराळ भागात इरसाळवाडी गावावर दरड कोसळल्याने येथील अनेक कुटुंबं मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली. अनेकांचा बळी गेला. त्यानंतर शासनाने तातडीने मदत कार्य सुरू करून पुनर्वसनाला गती दिली. गेली दोन वर्षात नवीन वसाहत तयार होऊन ४४ कुटुंबांना सर्वसोयीयुक्त घरे मिळाली आहेत.**



१९ जुलै २०२३ रोजी ही घटना घडल्यानंतर शासन खडबडून जागे झाल्याने या कुटुंबांना तात्पुरते चौक गावजवळ राहण्याची व्यवस्था व खाण्या पिण्याची व्यवस्था केली. त्यानंतर त्यांना या इरसाळवाडी गावजवळून ५ की मी च्या अंतरावर असणाऱ्या शासनाच्या जागेत कायमची पक्की घरे तयार करून देण्यासाठी राज्य शासनाने आदेश दिल्याने शासकीय यंत्रणा कामाला लागली आणि सिडकोने ही जबाबदारी घेऊन शिर्के कन्ट्रक्शन या बांधकाम कंपनीला घरे बनवून देण्यासाठी ठेका दिल्याने युद्धपातळीवर काम सुरू करून सर्व सोयीयुक्त घरे देऊन पूर्वसन केल्याने इरसाळवाडी पूर्वपदावर आल्याचे चित्र असून इरसाळवाडी खेळू बागडू लागले असल्याचे चित्र या नवीन वसाहतीध्ये आहे.खालापुरात तालुक्यासह सर्वत्र जोरदार पावसाच्या सरीमुळे सर्वत्र हाहाकार माजला असताना १९ जुलै ची ती काळी रात्र होती. या दिवशी इरसाळवाडी मधील हसती खळती कुटुंबावर दरड कोसळल्याने मातीच्या ढिगाऱ्याखाली गाडली गेली. बचवलेली काही मंडळी यांना तात्पुरते चौक गावजवलील एक खाजगी मालकीच्या जागेत तात्पुरते पूर्वसन केले मात्र पुन्हा अशी घटना घडू नये यासाठी राज्य शासनाचे मंत्री मंडळाने निर्णय घेतल्याने शासकीय यंत्रणा कामाला लागली तात्कालीन जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे यांच्या मार्गदर्शनाखाली येथील तात्कालीन प्रांत अधिकारी अजित नैराळे व तहसीलदार आयुब तांबोळी गटविकास अधिकारी सह सर्वच शासनाचे अधिकारी येथील कुटुंबाचे कायमस्वरूपी पूर्वसन होण्यासाठी कामाला लागले.

पान २ वर

# राजन साळवी ठाकरे गटाला रामराम करण्याच्या तयारीत

● राजापूर , दिगंबर जाधव :

राजापूरचे विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार राजन साळवी शिवसेना ठाकरे गटाला रामराम करण्याच्या तयारीत असल्याची माहिती समोर येत आहे. राजन साळवी यांनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी दिल्यास कोकणात ठाकरे गटाला मोठा धक्का बसण्याची शक्यता आहे. माजी आमदार राजन साळवी पक्षाला रामराम करण्याच्या तयारीत असल्याचं सांगण्यात येत आहे.

निवडणुकीत आणि निवडणुकीनंतर वरिष्ठ नेत्यांनी



दखल न घेतल्याने राजन साळवी पक्ष सोडण्याच्या तयारीत आहे. शिवाय, कुटुंबियांच्या मागे पुन्हा एसीबीचा ससेमिरा लागण्याची राजन साळवी यांना चिंता आहे. त्यामुळे महिनाभरात राजन साळवी याबाबत निर्णय घेणार आहेत. राजन साळवी भाजप की शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार याबाबत सध्या चर्चांना उधाण आले आहे. राजापूर विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाकडून किरण सामंत यांना उमेदवारी देण्यात आली होती, त्यांनी बहुमताने राजापुरात विजय मिळवला आहे. तर किरण सामंत यांच्या विरुद्ध उभे राहिलेल्या शिवसेना ठाकरे गटाच्या राजन साळवी यांचा पराभव झाला आहे.

## संपादकीय

### ध्रुवीकरणाने पछाडलेले जग

जागतिक अस्थिरतेकडे नव्या दृष्टिकोनातून पाहण्यासाठी २०२४ हे महत्त्वाचे वर्ष ठरले. शीतयुद्धाचे पर्व संपून तीन दशके उलटली तरी ध्रुवीकरणाचे राजकारण तिसऱ्या जगाला आजहीकरोनामुळे जगाची विस्कटलेली घडी अद्याप सावरलेली दिसत नाही. २०२१ चे जागतिक वैशिष्ट्य होते अमेरिका-चीन व्यापार युद्धाची सुरुवात २०२२ मध्ये रशियाचे युक्रेनवरील आक्रमण, २०२३ मध्ये हमासचा इस्रायलवरील हल्ला आणि इस्रायलने दिलेले प्रत्युत्तर. २०२४ कडे पाहताना असे जाणवेल की मानवी क्षमता जागतिक शांतता रुजविण्यास अपुऱ्या पडत आहेत. शांततेच्या शाश्वततेसाठी ज्या राजकीय व्यवस्था आपण उभ्या केल्या होत्या त्यांनाच तडे जाताना दिसत आहेत. बांगलादेशचे अवलोकन केल्याससुद्धा ही गोष्ट लक्षात येईल की, आर्थिक प्रगतीच्या दिशेने दमदार वाटचाल करणारा हा देश अचानक अराजकतेच्या गर्तेत अडकला. २०२४ च्या शेवटी हे प्रकर्षाने जाणवेल की स्थैर्य हा केवळ कल्पनाविलास असून जागतिक पटलावर सर्वदूर विकसित आणि विकसनशील या भेदापलीकडे लोकशाही आणि हुकूमशाही या दोन्ही शासन पद्धतींमध्ये अस्थिरतेचे वारे जोमाने वाहताना दिसतात. फोफावलेला भू-राजकीय संघर्ष रशिया युक्रेन युद्ध आणि इस्रायल पॅलेस्टाइन संघर्ष हे गेल्या एक दोन वर्षांपासून नियंत्रणात येण्याची चिन्हे नाहीत. युक्रेनमधील युद्धाची व्याप्ती यावर्षी वाढली. रशियाने मूलभूत पायाभूत सुविधांना लक्ष्य केले. कीव्हसारख्या शहरांना सततच्या बॉम्बफेकीचा सामना करावा लागला, ज्यामुळे नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आणि शेजारील देशांवर अधिक ताण आला. याचा प्रभाव अन्न आणि ऊर्जा पुरवठ्यावर होऊन अस्थिरतेची झळ युरोपपलीकडेदेखील पोहोचली. हे दुसरीकडे युक्रेनचे उच्चपदस्थ रशियन अधिकाऱ्यांना लक्ष्य करण्याचे प्रयत्न धारदार झाले. पुतिन यांचे प्रत्युत्तर हे २०२५ च्या घडामोडींची दिशा ठरविण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल. गाझा संघर्षामध्ये न भूतो स्वरूपाची हानी होऊन ५० हजारांपेक्षा अधिक व्यक्तींचा मृत्यू झाला, लाखो लोक विस्थापित झाले. अन्न, औषधांच्या कमतरतेमुळे मानवतावादी संकट वाढले. आंतरराष्ट्रीय मध्यस्थीचे प्रयत्न फसले. जागतिक शक्तींचा संघर्ष निराकरणात कमी होत चाललेला प्रभाव दिसून आला. येमेन, सोमालिया, माली, सुदान यांच्या यादवीमध्ये काही परिणामकारक घडले नाही, मात्र अमेरिका आणि रशिया यांच्याबरोबरच इराण, सौदीसारख्या शक्तींचा या स्थानिक संघर्षातील वाढता हस्तक्षेप आणि खासगी सैन्याचा वापर स्थानिकांची दैना अधिक तीव्र करणारा ठरला.

देशांतर्गत उठाव हे २०२४ चे प्रमुख वैशिष्ट्य म्हणता येईल. बांगलादेशचे उदाहरण तर आपण पाहिलेच ! सीरियामध्ये, नुकत्याच झालेल्या लष्करी उठावाने देशाची आधीच अनिश्चित स्थिती अधिक गडद केली. अनेक वर्षांच्या गृहयुद्धानंतर, या बदलामुळे राष्ट्र उभारणीचे स्वप्न अनिश्चिततेच्या गर्तेत सापडले आहे. बोलिव्हियाने लॅटिन अमेरिकेतील लोकशाही संस्थांची असुरक्षितता अधोरेखित उघड आणि प्रच्छन्न मार्गाने पछाडत आहे. करणारा अयशस्वी बंडाचा प्रयत्न अनुभवला. जनरल जुआन जोसे शुनिगा यांनी सत्ता काबीज करण्याच्या अल्पायुषी प्रयत्नाने प्रदेशातील नागरी-लष्करी संबंध संतुलित करण्यासाठी चालू असलेल्या संघर्षांचे प्रदर्शन केले. कदाचित सर्वात धक्कादायक बाब म्हणजे दक्षिण कोरियाचे राष्ट्राध्यक्ष यून सुक येओल यांनी स्वत: विरुद्धच केलेला उठावाचा प्रयत्न! मार्शल लॉ घोषित करून आणि नॅशनल असेंब्लीला दडपण्याचा प्रयत्न करून यून यांनी सुस्थापित प्रणालींमध्येही लोकशाही राजवटीची ठिसूळता अधोरेखित केली. हे सत्तापालट काही तासांतच रद्द करण्यात आले, तरीही निर्माण झालेली राजकीय अव्यवस्था धक्कादायक आहे. प्रस्थापित लोकशाहींनादेखील २०२४ मध्ये महत्त्वपूर्ण राजकीय आव्हानांना सामोरे जावे लागले. फ्रान्स पेन्शन सुधारणांच्या विरोधात मोठ्या प्रमाणात होणाऱ्या निषेधाचे केंद्र ठरला. त्याची परिणती पंतप्रधानांच्या राजीनाम्यात झाली. त्याचप्रमाणे आर्थिक अस्थैर्य आणि वाढत्या उजव्या शक्तींमुळे जर्मनीचे युती सरकार अंतर्गत विभाजनांशी संघर्ष करत होते. मतभेद हाताबाहेर गेल्यानंतर शोल्झ सरकारविरुद्ध अविश्वास ठराव मंजूर झाला. या अस्थिरतेचे जागतिक पातळीवर पडसाद उमटले. फ्रान्सच्या निदर्शनांमुळे युरोपीयन युनियनच्या धोरणनिर्मितीमध्ये व्यत्यय आला, तर जर्मनीच्या राजकीय अस्थिरतेमुळे युरोपमधील प्रमुख ताकद म्हणून आव्हानांना तोंड देण्याची नेतृत्वाची भूमिका कमकुवत झाली. आर्थिक आव्हाने आणि हवामानाच्या धक्क्यांनी २०२४ ची संकटे आणखी वाढवली. युरोप आणि आशियाला आर्थिक स्थैर्य, उच्च चलनवाढ आणि मंदीच्या भीतीचा सामना करावा लागला. जर्मनीमध्ये घसरलेल्या औद्योगिक उत्पादनामुळे बेरोजगारी वाढली, युती सरकारबद्दल असंतोष वाढला. पेन्शन सुधारणांच्या विरोधात फ्रान्सच्या निषेधाचे मूळदेखील आर्थिक तक्रारीत होते. नागरिकांनी चांगले जीवनमान आणि समान धोरणांची मागणी केली होती. हवामान आपत्तीमुळे उपलब्ध नैसर्गिक संसाधनांवर ताण आला. तापमान वाढीमुळे दक्षिण आशियातील पूर, आफ्रिकेतील दुष्काळ तीव्र झाले. त्यांचे रूपांतर स्थलांतर आणि संसाधन संघर्ष धारदार होण्यामध्ये झाले. बहुपक्षीय संस्थांची जागतिक संघांमध्ये प्रभावीपणे मध्यस्थी करण्याची असमर्थता हे २०२४ चे आणखी एक वैशिष्ट्य होते. युक्रेन आणि गाझामधील संघर्षांचे अर्थपूर्ण निराकरण करण्यात संयुक्त राष्ट्रे प्रयत्न करूनही अयशस्वी ठरली. पाश्चात्य राष्ट्रे आणि चीन- रशिया गट यांच्यातील विभाजनामुळे सुरक्षा परिषद लकवाग्रस्त झाली. एकूणच संघर्ष निराकरणाच्या पारंपरिक यंत्रणांची घटती प्रासंगिकता २०२४ मध्ये ठळकपणे दिसून आली. अमेरिकेच्या नेतृत्वात उदारमतवादी पाश्चात्य गट आणि चीन-रशिया अक्ष यांच्यातील शत्रुत्वामुळे आंतरराष्ट्रीय नेतृत्वात पोकळी निर्माण झाली, ज्यामुळे लहान राष्ट्रांना आर्थिक धक्के, हवामान संकटे आणि मर्यादित स्वायत्तता यांचा धोका निर्माण झाला. चीन आणि रशियाच्या नेतृत्वात इराण, उत्तर कोरिया 'क्रिन्क्स' या नव्या अक्षाचा उदय होण्याच्या मार्गावर आहे. आगामी काळात या अक्षाची होणारी वाटचाल पाहणे उत्कंठावर्धक राहील. रशियाच्या साहाय्याला उत्तर कोरियाने सैन्य आणि दारूगोळा पाठविल्यामुळे नव्या समीकरणांची नांदी दिसली आहे. २०२४ मध्ये जागतिक अस्थिरतेत योगदान देणारा एक गंभीर घटक म्हणून तांत्रिक प्रशासन उदयास आले. युक्रेन आणि गाझामध्ये स्मार्ट ड्रोन्स आणि घातक स्वायत्त शस्त्र प्रणालींच्या (छअहर) बेसुमार वापरामुळे अंदाधुंद नुकसान होऊन संघर्ष चिघळला. उदयोन्मुख तंत्रज्ञानावरील कमकुवत आंतरराष्ट्रीय नियमांमुळे अशा नवकल्पनांना नैतिक आणि कायदेशीर चौकटीला डावलण्याची पळवाट मिळाली. याव्यतिरिक्त, पॉवर ग्रीड्स, वित्तीय प्रणाली आणि आरोग्य सेवा नेटवर्क वारंवार लक्ष्य झाल्यामुळे, गंभीर पायाभूत सुविधांना लक्ष्य करणारे सायबर हल्ले वाढले.

# चिंताजनक विमान दुर्घटना



दक्षिण कोरियामध्ये जेजू एअरचे बँकॉक ते मुआन या मार्गावरचे विमान रविवारी मुआन विमानतळावर उतरताना भीषण अपघात झाला. या अपघातात विमान भस्मसात होऊन १७९ प्रवाशी दगावले. या अपघाताने संपूर्ण जगात हळहळ व्यक्त करण्यात आली. विमान अपघात घडून त्यात निष्पाप प्रवाशांचा जीव गेल्याची ही जगातील पहिलीच घटना नाही. या आधीही विमान अपघाताच्या अनेक घटना घडल्या आहेत. मागील वर्षीच म्हणजे २०२३ साली ऐन संक्रातीच्या दिवशी नेपाळमध्ये एक मोठी दुर्घटना घडली होती. नेपाळमधील प्रमुख शहरांपैकी एक असलेल्या पोखर या शहराजवळ एक प्रवाशी विमान कोसळून झालेल्या अपघातात ६० हुन अधिक प्रवाशांचा दुःखद अंत झाला होता. कोरियात झालेला विमान अपघात हा विमानात तांत्रिक बिघाड झाल्याने झाल्याचे सांगण्यात आले आहे मात्र विमानाचा ब्लॅक बॉक्स मिळाल्यानंतरच या अपघाताचे खरे कारण समोर येईल. मागील वर्षी नेपाळमध्ये झालेला विमान अपघात हा खराब हवामानामुळे झाला होता. बहुतेक विमान अपघात हे खराब हवामानामुळेच झाल्याचे सांगण्यात येते. खरे तर उड्डाणापूर्वी प्रत्येक वैमानिकाला हवामानाचा अंदाज सांगितला जातो. या आधारावर तो आपली रणनीती ठरवतो. वातावरणाची दृष्यमानता कमी असेल तर वैमानिक उड्डाण करत नाहीत. अर्थात पर्वतीय भागात दृष्यमानता कमी असतेच. डोंगराची कमी, जास्त उंची असल्याने आणि सतत बदलणारे हवामान, धुके यामुळे अपघात होण्याची शक्यता असते मात्र अलीकडे अद्ययावत संगणक प्रणाली असल्याने विमान किती उंचावरून जात आहे हवामानात काय बदल घडत आहे याचा अंदाज वैमानिकांना येतच असतो तरीही काही वैमानिक अतिआत्मविश्वासाने विमान उड्डाण करतात. हवामानाची पर्वा न करता स्वतःसह प्रवाशांचा जीव धोक्यात घालतात. काही वेळा पक्षाची धडक बसल्याने विमान अपघात झाल्याचे सांगण्यात येते. तांत्रिक कारण, खराब हवामान, पक्षाची धडक कारण काहीही असले तरी विमान अपघातात ज्या प्रवाशांचा यात जीव जातो तो मात्र परत येत नाही. अलीकडे विमान अपघातांचे प्रमाण खूप वाढले आहे. १९७० पासून आजवर ११ हजार १६४ विमान अपघात झाले असून त्यात ८३ हजारांहून अधिक प्रवाशी मृत्युमुखी पडले आहेत. हा आकडा चिंताजनक आहे. भारततही अलीकडे विमानात बिघाड झाल्याच्या घटना वाढल्या आहेत. मागील वर्षी दिल्लीवरून बंगळुरुला जाणाऱ्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले होते. वैमानिकाने यशस्वी लँडिंग केल्याने सुदैवाने अपघात टळला होता. विमान उड्डाण करत असताना विमानातून ठिणग्या उडत असल्याचे वैमानिकाच्या लक्षात आल्याने विमानाचे इमर्जन्सी लँडिंग करावे लागले. प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्यावेळी अपघात टळला आणि शेकडो प्रवाशांचा जीव वाचला होता. त्या प्रवाशांचे नशीब बलवत्तर होते म्हणून त्या विमानाचा अपघात झाला नाही मात्र आपल्या देशात विमान अपघातात अनेक लोकांना जीव गमावावा लागला आहे. त्यात अनेक राजकीय आणि महनीय व्यक्तींचा समावेश आहे. संजय गांधी, माधवराव सिंधिया, जी एम सी बालयोगी हे त्यातील काही महत्वाची नावे आहेत. दोन वर्षापूर्वी भारताचे पहिले चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ ( सिडीएस ) जनरल बिपीन रावत यांचे एका हेलिकॉप्टर अपघातात निधन झाले होते. विमान अपघातात अशा मोठ्या व्यक्तींचे निधन होणे ही देशाची मोठी हानी आहे. केवळ मोठे सिलिब्रेटीच नव्हे तर सर्वसामान्य प्रवाशांचा जीव देखील तितकाच महत्वाचा आहे. सर्वसामान्य मध्यमवर्गीय नागरिकांसाठी तर विमान प्रवास हे स्वप्न असते आणि जर असे अपघात झाले तर त्या स्वप्नांचीच नव्हे तर त्याच्या संपूर्ण कुटुंबाचीच राखरांगोळी होते त्यामुळे असे अपघात होणार नाही याची काळजी संबंधित यंत्रणेने घ्यायला हवी.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

## पान १ वरून...

### ठाण्यातील ३९ बांधकाम व्यावसायिकांना...

तसेच, सर्व २९७ बांधकाम स्थळांना अचानक भेट देऊन सर्व नियमांचे पालन होत असल्याची खात्री पर्यावरण विभागाने सतत करावी, असेही माळवी यांनी स्पष्ट केले.

ठाणे महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता राखण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिकेच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार ठाणे महापालिकेच्या पर्यावरण विभागाने विविध प्रकारच्या उपाययोजना हाती घेतल्या आहेत. या उपाययोजनांचा आढावा बुधवारी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (१) संदीप माळवी यांनी घेतला. या आढावा बैठकीस, नगर अभियंता प्रशांत सोनाग्रा, उपायुक्त पद्मश्री बैनाडे, उपायुक्त सचिन सांगळे, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. चेतना नितील, आरोग्य अधिकारी डॉ. राणी शिंदे यांच्यासह महापालिकेचे सर्व सहाय्यक आयुक्त, मेट्रो, एमएसआरडीसी, परिवहन विभाग, पोलीस आदी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

हवा प्रदूषणाचा परिणाम सगळयांना सहन करावा लागत आहे. त्यामुळे सर्व यंत्रणांनी महापालिकेच्या समन्वयाने मा. उच्च न्यायालय आणि प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोर पालन करावे, असे माळवी यांनी स्पष्ट केले. मेट्रो आणि एमएसआरडीसी यांनीही कामे करताना हरित जाळी लावून धूळ नियंत्रण करावे, असेही त्यांनी सांगितले.

आतापर्यंत, हवा प्रदूषणाबाबत महापालिकेकडे प्राप्त झालेल्या विविध तक्रारींबाबत पर्यावरण विभागाने १,७०,००० रुपये दंडाची कारवाई केली असल्याची माहिती मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान यांनी दिली आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या निर्देशानुसार, ठाण्यातील विकासकांद्वारे त्यांच्या प्रकल्पात, ५० ठिकाणी हवा प्रदूषण मोजणीचे यंत्र बसविण्यात आले आहे. त्याची सातत्याने पाहणी पर्यावरण विभागामार्फत केली जात आहे. इतर व्यावसायिकांनीही ही यंत्रणा ताबडतोब बसवावी. त्याबाबत हयगय झाल्यास कारवाई करावी, असेही माळवी यांनी स्पष्ट केले.

**पालापाचोळा जाळणाऱ्यांवर कारवाई**

ठाणे महापालिका क्षेत्रात उघड्यावर पालापाचोळा, कचरा, प्लास्टिक जाळण्यास बंदी घालण्यात आली आहे. त्याची काटेकोर अमलबजावणी करण्यात येत आहे. आतापर्यंत त्याबाबतच्या ०९ तक्रारी प्राप्त झाल्या असून घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे पाहणी करून २० हजार रुपये दंडाची कारवाई करण्यात आली. तसेच, हॉटेल्स, तंदूर, रेस्टॉरंट, बेकरी येथे जळाऊ लाकूड वापरण्याबाबत बंदी घालण्यात आली आहे.

**तोडफोड कचऱ्याची विल्हेवाट**

ठाणे महापालिकेचा बांधकाम व तोडफोड कचरा विल्हेवाट प्रकल्प ३०० टन क्षमतेचा आहे. या प्रकल्पात मार्च २०२४ ते नोव्हेंबर २०२४ या काळात ७४१४ टन तोडफोड कचऱ्याचे संकलन आणि पुनर्वापर करण्यात आले आहे. त्याचबरोबर, सर्व बांधकाम विकासक आणि ठेकेदार यांनी जीपीएस यंत्रणा असलेल्या वाहनांमधूनच डेब्रिज वाहतूक करण्याचे बंधन घालण्यात आले आहे.

**५९०९ वाहनांवर कारवाई**

ठाणे महापालिकेतर्फे प्रादेशिक परिवहन विभागाशी समन्वय साधून आनंद नगर चेक नाका व दहिसर चेक नाका येथे डेब्रिज वाहतूक करणाऱ्या व ताडपत्री नसलेल्या एकूण ५९०९ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. तसेच, पीयूसी नसलेल्या ४००८ वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे. डेब्रिजची विल्हेवाट लावण्यात येणाऱ्या स्थळाचा वाहतूक पास असल्याशिवाय अशा वाहनांना ठाणे महापालिका हद्दीत प्रवेश बंदी करण्यात आली आहे.

**तक्रारीसाठी टोल फ्री क्रमांक व इमेल**

हवा प्रजूषण नियंत्रणाबदद्लच्या तक्रारी करण्यासाठी ८६५७८८७१०१ हा टोल फ्री क्रमांक नागरिकांसाठी उपलब्ध करण्यात आला आहे. त्याचबरोबर, pcctmc.ho@gmail.com या इमेलवरही तक्रार नोंदवता येईल.

### दुःख पचवून पुन्हा इरसाळवाडी झाली हसती...

या ठिकाणी जवळपास ५ की मी च्या अंतरावर असणारे नानिवली गावजवळ जवळपास साडेसहा एकर शासकीय जागेत ४४ कुंबाना पक्की घरे बांधून देण्यासाठी पाऊले उचलली त्यानुसार ही जबाबदारी सिडको कडे देण्यात आली आणि शिर्के कन्ट्रक्शन कंपनीला घरे तयार करण्यासाठी बांधकामालाची जबाबदारी दिली आणि युद्धपातळीवर काम सुरू करून प्रत्येक कुटूंबाला साडे तीन गुंठे जागेत सुसज्ज घर तयार करण्यात आले आहेत. या ठिकाणी ठरवून दिलेल्या जागेत स्वतंत्र परसबाग, २४ तास पाणी बाथरूम, आजूबाजूला सुरक्षा भिंत किचन रुम, बेडरूम, हॉल खेळती हवा राहावी यासाठी सलयडिंग खिडक्या बालवाडी, शाळा आणि गुराढोरांसाठी स्वतंत्र शेड देण्यात आले आहेत. त्यामुळे इरसाळवाडी पुन्हा सर्व दुःख पचवून हसती खेळती असल्याचे चित्र या नवीन वसाहती आहे.

### नव्या वर्षात पनवेल - कर्जत रेल्वे धावणार

पनवेल कर्जत रेल्वे मार्गाचे खास वैशिष्ट्य म्हणजे मुंबई महानगरातील सर्वाधिक लांबीचा बोगदा या प्रकल्पाअंतर्गत तयार केला जात आहे. तर २९.६ किमी लांबीच्या या नव्या रेल्वे मार्गावर तीन बोगदे तयार करणार असून, तिन्ही बोगद्यांचे खोदकामास सुरुवात झाली आहे. तर मध्य रेल्वेच्या ठाणे-दिवा स्थानका दरम्यान सध्या १.६ किमी पारसिक बोगदा हा सर्वात मोठा बोगदा आहे. व भारतीय रेल्वेवरील एक किमीपेक्षा जास्त लांबीचा हा पहिला बोगदा आहे. मात्र पनवेल - कर्जतदरम्यानच्या वावर्ले येथील २.६ किमी लांबीचा बोगदा उभारला जात आहे. वावर्ले येथील बोगदा सर्वाधिक लांबीचा आहे. कर्जत-पनवेल दरम्यान सध्याचा सुरू असलेला ट्रॅक हा माल व काही मेल एक्स्प्रेस ट्रेनसाठी वापरला जात आहे. मात्र नवीन दुहेरी मार्गिकेमुळे मुंबई ते कर्जत दरम्यान उपनगरीय लोकल रेल्वे पनवेलमार्गे धावणार आहेत. हा मार्ग तयार झाल्यास सीएसएमटी-कर्जत मार्गे पनवेल हा रेल्वेचा नवा पर्याय उपलब्ध होईल.

रेल्वे मार्गाचे काम युद्धपातळीवर

मुंबईवरुन पनवेलमार्गे लोकल ट्रेनने कर्जतला पोहोचण्याच्या दृष्टीने सुरु असलेल्या रेल्वे मार्गाचे काम सध्या वेगाने सुरु आहे. मिळालेल्या माहितीनुसार या कॉरिडॉरचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे. पनवेल ते कर्जत दरम्यान २९.६ किमी लांबीचा हा रेल्वेमार्ग आहे. या प्रकल्पासाठी २,७८२ कोटी रुपये खर्च करण्यात येत आहेत. या कॉरिडॉरचे काम मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प ३ अंतर्गत मुंबई रेल्वे विकास महामंडळ मार्फत केले जात आहे.

### डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागात ...

या आदेशाप्रमाणे फ प्रभागाच्या साहाय्यक आयुक्त हेमा मुंबरकर यांनी आपल्या फ प्रभाग हद्दीतील डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक भागात रेल्वे स्थानकापासून दीडशे मीटरपर्यंत सफेद पट्टे आखून घेतले आहेत. या सफेद पट्टयांच्या आत एकाही फेरीवाल्याने व्यवसाय करू नये. ही सीमारेषा मोडून कोणी फेरीवाल्याने व्यवसाय केला तर त्यांच्यावर दंडात्मक आणि फौजदारी कारवाई केली जाणार आहे. फेरीवाल्यांसाठी या सीमारेषा इंदिरा चौक, बाजीप्रभू चौक, फडके रस्ता, नेहरू रस्ता भागात मारण्यात आल्या आहेत. रामनगर, राजाजी रस्ता, शिवमंदिर रस्ता परिसर ग प्रभागाचे साहाय्यक आयुक्त संजयकुमार कुमावत यांनी फेरीवाला मुक्त केला आहे. फ आणि ग प्रभागाची फेरीवाला हटाव पथके सकाळपासून रेल्वे स्थानक भागात तैनात राहत असल्याने डोंबिवली पूर्व रेल्वे स्थानक परिसर फेरीवाला मुक्त होत आहे. डोंबिवली पश्चिमेतील रेल्वे स्थानक भागात काही फेरीवाल्यांना बसून द्यावे म्हणून ह प्रभागातून बदली झालेला एक कामगार ह प्रभागात लुडबुड करत असल्याचे तक्रारदार नागरिक, फेरीवाल्यांच्या चर्चेतून समजते.

### महाराष्ट्रात क्रांती, पहिले...

तरुणांना रोजगार मिळतील व तंत्रज्ञानाच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्र सक्षमपणे स्पर्धा करु शकेल असे त्यांनी यावेळी सांगितले. सह्याद्री अतिथीगृहावर आज माहिती व तंत्रज्ञान विभागाचा मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आढावा घेतला. या बैठकीस आयटी विभागाचे सचिव पराग जैन नैनुटिया, महाआयटीच्या व्यवस्थापकीय संचालक जयश्री भोज आणि संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री आशिष शेलार यांनी विभागाचा आढावा घेत अधिकाऱ्यांना पुढील वाटचालीविषयी मार्गदर्शन करताना म्हटले की, एआय तंत्रज्ञानाचं युग सुरू झाले आहे. महाराष्ट्राने या क्षेत्रात आघाडी घेतली पाहिजे. एआयचा प्रभावी उपयोग करून आपण अधिक उद्योग व व्यवसाय आकर्षित करीत तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देऊ शकतो. जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राचे स्थान भक्कम करण्याची ही संधी आहे. मार्च २०२४ मध्ये सुरू करण्यात आलेल्या 'इंडिया एआय मिशन' अंतर्गत देशभरात एआय क्षमता वाढवण्यासाठी १०,३७२ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यात इंडिया एआय डेटासेट्स प्लॅटफॉर्म, ॲप्लिकेशन डेव्हलपमेंट प्रकल्प, ग्राफिक प्रोसेसिंग युनिट्स, इंडिया एआय इनोव्हेशन सेंटर, फ्युचर स्किल्स प्रोग्राम आणि एआय क्षेत्रातील स्टार्टअप्ससाठी वित्तपुरवठा यांचा समावेश आहे.

### स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच गडचिरोलीच्या...

गडचिरोलीला स्टील सिटी बनवण्याच्या स्वप्नाकडे वाटचाल सुरु झाली आहे."

गेल्या चार वर्षात एकही गडचिरोली जिल्ह्यातील किंवा महाराष्ट्रातील तरूण-तरूणी माओवादी संघटनेत सहभागी झाले नाहीत. त्यांचे वरीष्ठ नेतृत्व मोठ्या प्रमाणात शरणागती पत्करत आहेत. त्यामुळे लोकांचा विश्वास भारताच्या संविधानावर आहे माओवादावर विश्वास नाही," अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.

### नौदलाच्या ताफ्यात येणार एकाच दिवशी तीन...

या जहाजांच्या आरेखन आणि क्षमतांमध्ये भरीव सुधारणा केलेल्या आहेत. दोन्ही जहाजांची रचना भारतीय नौदलाच्या युद्धनौका आरेखन ब्युरोने केली असून त्या प्रगत सेन्सर्स आणि शस्त्रास्त्र साठ्याने सुसज्ज आहेत. ही शस्त्रास्त्रे देखील प्रामुख्याने भारतात किंवा आघाडीच्या जागतिक उत्पादकांसोबत धोरणात्मक सहकार्याने विकसित केली गेली आहेत.

आधुनिक विमान वाहतूक सुविधांसह सुसज्ज, निलगिरी आणि सूरतमध्ये चेतक, एएलएच, सी किंग आणि नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या एमएच-६-आर यासह अनेक हेलिकॉप्टरचा समावेश असून हे हेलिकॉप्टर दिवसा आणि रात्री दोन्हीवेळा चालणाऱ्या मोहीमांमध्ये सहभागी होऊ शकतात. रेल-लेस हेलिकॉप्टर ट्रॅव्हर्सिंग सिस्टीम तसेच व्हिज्युअल एड आणि लँडिंग सिस्टीम यासारखी आधुनिक वैशिष्ट्ये सर्व परिस्थितींमध्ये मोहीम अखंड चालू राहील हे सुनिश्चित करतात. या जहाजांमध्ये महिला अधिकारी आणि महिला खलाशांना मोठ्या प्रमाणात संधी देण्यासाठी विशिष्ट निवासस्थानांचा देखील समावेश केला आहे, जे आघाडीच्या लढाऊ भूमिकांमध्ये लिंगभाव समावेश करण्याच्या दिशेने नौदलाच्या प्रगतीशील पावलांशी संरेखित आहे.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# कर्णबधिर मुलेही गिरवू लागली ए.आय.चे धडे !



## ३१ डिसेंबरच्या रात्री ३११ मद्यपी चालकांविरोधात कारवाई

**ठाणे (यश सावंत) :** नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला अनेकजण मद्य पिऊन वाहन चालवितात. या पार्श्वभूमीवर ठाणे वाहतुक पोलिसांनी ३११ मद्यपी वाहन चालकांविरोधात आणि त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या ५८ सह प्रवाशांविरोधात कारवाई केली आहे. ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात ही कारवाई करण्यात आली आहे.

नववर्ष स्वागताच्या पूर्वसंध्येला मोठ्याप्रमाणात पार्ट्यांचे आयोजन केले होते. त्यामुळे मंगळवारी रात्री ठाणे जिल्ह्यातील विविध भागात ढाबे, हॉटेल आणि फार्म हाऊसमध्ये पार्ट्यांसाठी नागरिकांची गर्दी झाली होती. पार्टी केल्यानंतर अनेकजण मद्य पिऊन वाहने चालवितात. या प्रकारामुळे अपघाताची भिती निर्माण होत असते. तसेच मद्यपी वाहन चालकांसोबत सह प्रवासी देखील असतात. या घटनेत मद्यपी वाहन चालकामुळे इतर प्रवाशांच्या जीवावरही बेतण्याची शक्यता असते. त्यामुळे ठाणे वाहतुक पोलिसांनी आयुक्तालय क्षेत्रात म्हणजेच, ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात मुख्य चौकांमध्ये वाहन चालकांची तपासणी केली होती.

**ठाणे (सम्यक कासारे) -** नियतीने केलेल्या अन्यायामुळे बोलता आणि कानाने ऐकता न येणाऱ्या मुलांसाठी आज अनेक संस्था धडपडत आहेत. या मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे. शिकून हिच मुले स्वत:च्या पायावर उभी राहिली पाहिजेत म्हणून काही संस्था, व्यक्तींचे काम सुरू आहे. भारतातील पहिली कर्णबधीर मुलांसाठीची 'ए.आय. आणि रोबोटिक्स' लॅब स्थापन झाली आहे. दापोली येथील इंदिराबाई वामन बडे कर्णबधिर विद्यालयातील ३० कर्णबधिर विद्यार्थी ए.आय. (कृत्रीम प्रज्ञा) आणि रोबोटिक्सचे धडे घेऊ लागले आहेत.



स्काय रोबोटिक्स पुणे यांच्या माध्यमातून भारतातील ही पहिली कर्णबधिर मुलांसाठीची लॅब निर्माण करण्यात आली असून विद्यार्थ्यांनी त्या ठिकाणी शिक्षण घेण्यास सुरुवात केली आहे. स्काय रोबोटिक्सचे संचालक अभिजीत सहस्त्रबुद्धे व कृष्णमूर्ती बुक्का यांनी या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी मोफत सुविधा उपलब्ध केली आहे. दापोली या ठिकाणी इंदिराबाई वामन बडे कर्णबधिर विद्यालयात तीस विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना ही मोठी उपलब्धी झाली आहे. आज अनेक मोठ्या शाळांमध्ये देखील ए. आय. आणि रोबोटिक्सचे शिक्षण मिळत नाही. मात्र, या संस्थेने बोलता आणि ऐकता न येणाऱ्या या मुलांसाठी आणि त्यांच्या भविष्यासाठी हे शिक्षण सुरू केले आहे. त्यासाठी अद्ययावत लॅब तयार करण्यात आली असून आवश्यक संगणक, अभ्यासक्रमाचे सर्व साहित्य उपलब्ध केले आहे. या शाळेतील शिक्षिका श्रद्धा गोविलकर या विद्यार्थ्यांना ए.आय. आणि रोबोटिक्सचे धडे देत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी स्वत: पुणे येथे जाऊन प्रशिक्षण घेतले आणि त्यानंतर त्या विद्यार्थ्यांना ए.आय. व रोबोटिक्सचे धडे देत आहेत.

या कर्णबधिर विद्यालयात दहावीपर्यंतचे विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांमधील सर्जनशिलता, नवकल्पना आणि तांत्रिक कौशल्यांना वाव देण्यासाठी स्काय रोबोटिक्सने कर्णबधिर विद्यार्थ्यांना हे व्यासपीठ मिळवून दिले आहे.



## प्रदूषण परिस्थितीची लपवा छपवी

**ठाणे (विशाल कारंडे ) –** सायंकाळनंतर धूळ आणि धुरक्यात हरवून जाणाऱ्या शहरांत प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत असताना ठाणे जिल्ह्यात या प्रदूषणाचे नेमके मोजमापच होताना दिसत नाही. एकीकडे खासगी संस्था आणि संकेतस्थळांच्या लेखी जिल्ह्यातील बहुतांश भागांत हवेचा स्तर वाईट असताना प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळांवर हवा समाधानकारक असल्याचे दिसत आहे. त्यातच सध्या हवेतील प्रदूषणामुळे आरोग्याच्या तक्रारी वाढत असताना या समाधानकारक शेऱ्यामागे लपवाछपवी नाही ना अशी शंका उपस्थित होत आहे.

ठाणे जिल्ह्यात मागील काही वर्षांमध्ये मोठ्याप्रमाणात सरकारी प्रकल्प उभारले जात आहेत. त्यासोबतच, ठाणे, डोंबिवली, कल्याण, बदलापूर पट्ट्यात इमारती उभारल्या जात आहेत. जिल्ह्यात कारखान्यांचे प्रमाणही अधिक आहे. त्यामुळे रस्त्यावर धुळधाण तसेच वायू प्रदूषण पसरते. मुंबई उपनगरातील गुणवत्ता वाईट अवस्थेत असताना दुसरीकडे ठाणे जिल्ह्यामध्ये ३१ डिसेंबरला केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावरील हवेची गुणवत्ता समाधानकारक आणि मध्यम असल्याचे दर्शवित आहे. याउलट एक्यूआय डॉट इन संकेतस्थळावर वाईट श्रेणीमध्ये दर्शवित होता.

## कल्याण शिधापत्रिका अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची रूपेश भोईर यांची मागणी

**कल्याण (गणेश बागडे) :** शिधापत्रिका अधिका-याच्या हलगर्जीपणामुळे एक महिलेचे उपचारा अभावी निधन झाले असल्याने कल्याण शिधापत्रिका अधिकारी यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी सहाय्यक पोलिस आयुक्त कल्याणजी घेटे यांना निवेदन देत शिवसेना उबाठा गटाचे विधानसभा सह संघटक रूपेश भोईर यांनी केली आहे.



शिधापत्रिका अधिका-याच्या हलगर्जीपणामुळे एक महिलेचा उपचारा अभावी निधन झाले आहे. कल्याण पश्चिम येथील जुना मच्छी बाजार च्या मरियम चाळीत राहणा-या फिरदोस अब्दुल कलाम अंसारी नावाच्या महिलेच्या ०२/०४/२०२४ रोजी छातीत दुखायला लागला. उपचारा साठी महिलेला कल्याणच्या मीरा रूग्णालयात भर्ती केले पण तिथल्या चिकित्सकांनी जो खर्च सांगीतला तो त्या महिलेच्या नातेवाईकांना परवडणारा नव्हता.

नातेवाईकांनी शासकीय योजनेचा फायदा घेण्यासाठी धावपळ सुरू केली. त्या साठी रेशन कार्ड पाहिजे होते. परंतु रेशन कार्ड गहाळ झाल्याने ते मिळत नव्हते, त्याची फक्त झेरॉक्स प्रत नातेवाईकांकडे होती. नातेवाईकांनी त्या झेराक्स च्या आधारे शिधापत्रिका अधिका-याला विनंती केली की आम्हाला झेरॉक्स च्या आधारे नवीन शिधापत्रिका तात्काळ बनवून द्या. पण शिधापत्रिका अधिका-याने काही लक्ष दिले नाही.

कार्यालयातील काही कर्मचारी महिलेच्या नातेवाईकांकडून आर्थिक अपेक्षा ठेऊन पाच दिवसांनी या असे सांगितले, पांच दिवसांनी गेल्यावर आठवड्या नंतर या असे बोलायला लागले. महिलेच्या नातेवाईकांकडून नवीन शिधापत्रिका साठी दहा ते पंधरा हजार रूपयांची मागणी केली जात होती. हि सगळी धावपळ करताना महिलेचा उपचारा अभावी निधन झाले.

योग्यवेळी महिलेला शिधापत्रिका मिळाली असती तर कदाचित महिलेचे प्राण वाचले असते. त्यामुळे या महिलेच्या मृत्यूला कल्याणचे शिधापत्रिका अधिकारी जवाबदार असल्याचा आरोप भोईर यांनी केला आहे. या प्रकरणी चौकशी करून शिधापत्रिका अधिका-यावर

सदोष मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशा आशयाचे निवेदन रूपेश भोईर यांनी सहाय्यक पोलीस आयुक्त यांना दिले आहे.

## ३ जानेवारी रोजी वाशी येथील विष्णुदास भावे नाट्यगृहात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन

**नवी मुंबई (भावना जैन) -** नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत दरवर्षी ३ जानेवारी रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिन नानाविध उपक्रम राबवून उत्साहाने साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिला व मुलींकरिता रांगोळी, मेहेंदी, निबंध, पाककला, सॅलेड सजावट, टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे, नृत्य व गायन स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे महानगरपालिका कार्यक्षेत्रातील महिला व बालकल्याण क्षेत्रामध्ये उत्कृष्ट काम करणा-या सामाजिक संस्था / महिला मंडळे यांना क्रांतीज्योजी सावित्रीबाई फुले पुरस्काराने सन्मानित करण्यात येत असते.



या अनुषंगाने रांगोळी स्पर्धा, योगासने, नृत्य व गायन घेण्यात आल्या असून पाककला, सॅलेड सजावट व टाकाऊपासून टिकाऊ वस्तू तयार करणे या स्पर्धा दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी या ठिकाणी घेण्यात येणार आहेत.

३ जानेवारीच्या कार्यक्रमात विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ, सावित्रीबाई फुले पुरस्कार प्रदान समारंभ तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रम हे प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहेत. तरी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जास्तीत जास्त महिला / महिला मंडळे / महिला बचत गट यांनी दि. ०३ जानेवारी २०२५ रोजी विष्णुदास भावे नाट्यगृह, वाशी या ठिकाणी सकाळी ९.३० वाजल्यापासून क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमास आवर्जून उपस्थित रहावे, असे जाहीर आवाहन नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

## ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय खारेगाव येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवनात स्थलांतरित

**ठाणे (रोहित जैसवाल) :-** बेलापूर येथील कोकण भवनात असलेले ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कार्यालय आता खारेगाव कळवा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे स्थलांतरीत झाले आहे. अर्जदार यांनी त्यांच्या जात दाव्याबाबत उपरोक्त पत्त्यावर संपर्क करावा, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य श्रीम. प्राची वाजे व संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव श्री. प्रसाद खैरनार यांनी केले आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अतंर्गत असलेले ठाणे जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय नवी मुंबईतील कोकण भवन येथे होते. आता हे कार्यालय, खारेगाव-कळवा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा मजला, दत्तवाडी बस स्टॉप जवळ,



खारेगांव कळवा, ठाणे, पिन कोड ४००६०५ येथे नवीन जागेत स्थालांतरित झाले आहे. जात दाव्यासंदर्भात अर्जदारांनी कार्यालयाच्या नवीन पत्त्यावर संपर्क साधावा, तसेच नविन अर्जदारांनी त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी बाबतचे प्रस्ताव विहित नमुन्यात ऑनलाईन तसेच मूळ प्रत विहित कालावधीत उपरोक्त नवीन पत्त्यावरील कार्यालयात समक्ष जमा करावे, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य श्रीम. वाजे यांनी केले आहे.

## विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासाबरोबरच दैनंदिन जीवनातही वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवून आपल्या जीवनातील समस्या सोडवल्या पाहिजे व नव्याचा शोध घेतला पाहिजे - केडीएमसी अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड

**कल्याण (आकाश कांबळे) :** विद्यार्थ्यांनी शालेय अभ्यासाबरोबरच दैनंदिन जीवनातही वैज्ञानिक दृष्टीकोन ठेवून आपल्या जीवनातील समस्या सोडवल्या पाहिजे व नव्याचा शोध घेतला पाहिजे असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी शिक्षण विभागातर्फे आयोजित महापालिका स्तरीय आंतरशालेय विज्ञान प्रदर्शन पारितोषिक वितरण सोहळयाप्रसंगी आपल्या भाषणात केले.



दि. ३० व ३१ डिसेंबर रोजी अचिवर्स महाविदयालय येथे संपन्न झालेल्या या दोन दिवसीय महानगरपालिका स्तरीय विज्ञान प्रदर्शन पारितोषिक वितरण कार्यक्रमास महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड, महापालिका सचिव किशोर शेळके, शिक्षण विभागाचे उपायुक्त प्रसाद बोरकर, प्रशासन अधिकारी रमेश चव्हाण, शिक्षणाधिकारी विजय सरकटे व इतर मान्यवर उपस्थित होते.

विज्ञान प्रदर्शनात महानगरपालिका स्तरावर प्रथक क्रमांक मिळविण्याचा मान कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळा क्र. ५५ खारी आंबिवली, व्दितीय क्रमांक मिळवण्याचा मान कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळा क्र. ३९ कचोरे तसेच तृतीय क्रमांक मिळवण्याचा मान कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळा क्र. ९२/५ घासबाजार यांना मिळाला. त्याचबरोबर महापालिका स्तरावर उत्तेजनार्थ २ पारितोषिके कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळा क्र.६८ बारावे व कल्याण डोंबिवली महानगरपालिका शाळा क्र.८७/३डोंबिवली (प.) या शाळेस मिळाले.

तसेच खाजगी शाळांमधून प्रथम क्रमांक मिळविण्याचा मान डॉन बॉस्को हायस्कुल डोंबिवली (प.), व्दितीय क्रमांक मिळवण्याचा मान वाणी विदयालय शाळा हायस्कुल, तृतीय क्रमांक मिळवण्याचा मान मुस्लिम उर्दु स्कुल या शाळेस मिळाला. त्याबरोबर चंद्रकांत पाटकर मराठी हायस्कुल व सेंट थॉमस हायस्कुल या शाळेच्या विज्ञान प्रकल्पांस उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

## पुन्हा तीन महिन्यांसाठी टँकर बंदी! प्रदूषण रोखण्यासाठी पुन्हा सोप्या पर्यायाची निवड

**अंबरनाथ (विवेक गुंजाळ):** नैसर्गिक नदी, नाल्यांमध्ये थेट सोडले जाणारे प्रक्रिया न केलेले रासायनिक सांडपाणी आणि प्रदूषण रोखण्यात कायमच अपयशी ठरलेल्या प्रशासनाने अनेकदा सोपे मार्ग निवडले आहेत. यापूर्वी असे प्रकार रोखण्यासाठी पोलीस प्रशासन १२ तास टँकर बंदीचा मार्ग अवलंबला होता. आता पुन्हा पोलिसांच्या विशेष शाखेने डोंबिवली, अंबरनाथ, अतिरिक्त अंबरनाथ आणि बदलापूर येथील औद्योगिक क्षेत्रातून ४ जानेवारी २०२५ ते ४ मार्च २०२५ या तीन महिन्यांच्या



कालावधीत सर्व प्रकारच्या टँकर वाहतुकीला बंदी घातली आहे. त्यामुळे पुन्हा उद्योजकांना त्रासाला सामोरे जावे लागणार आहे. डोंबिवली, अंबरनाथ आणि बदलापूर येथील औद्योगिक क्षेत्रात मोठ्या संख्येने रासायनिक कारखाने आहेत. या कारखान्यांमधील उत्पादनांसाठी लागणाऱ्या रसायनांची मोठ्या प्रमाणात शहरांतून वाहतूक होते. मात्र अनेकदा काही कंपन्यांकडून प्रक्रिया न केलेले रासायनिक सांडपाणी पैसे वाचवण्यासाठी थेट शहरांतून जाणाऱ्या नदी आणि नाल्यात सोडण्यात येते. यामुळे नदीचे आणि खाडी पात्रातील पाणी मोठ्या प्रमाणात प्रदूषित होते. त्याचा आसपासच्या रहिवाशांना त्रास झाल्याचे यापूर्वीही समोर आले होते.

### उद्योजकांना अपेक्षित काय?

औद्योगिक वसाहती मधील काही कंपन्या खर्चीत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प उभारता हे सांडपाणी हे टँकरमध्ये भरतात आणि उघड्या नाल्यांमध्ये सोडतात. त्यामुळे प्रदूषणाचे प्रश्न निर्माण होतात. अशा काही प्रवृत्तींना रोखण्यासाठी या टँकरची तपासणी व्हावी अशी उद्योजकांची मागणी आहे. टँकर बंदीमुळे अनेकदा कच्च्या मालाचे टँकरही या काळात बंद ठेवावे लागतात. ते रस्त्याच्या कडेला उभे करावे लागतात. त्याचा उद्योजकांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागतो. वाहतूक कोंडीमुळे आधीच हे टँकर रखडत उशिराने कंपन्यांमध्ये पोहोचतात. त्यामुळे प्रवास खर्च वाढला आहे.

## कल्याण-डोंबिवली शहरांचा पाणी पुरवठा आज अठरा तास बंद

**कल्याण (आकाश कांबळे) :** कल्याण, डोंबिवली, टिटवाळा शहरांना पाणी पुरवठा करणाऱ्या जलशुध्दीकरण केंद्रांच्या देखभाल, दुरुस्तीचे काम, प्रभागांमधील पाणी पुरवठा वितरण वाहिन्यांमधील गळती दुरुस्तीची कामे गुरुवारी (ता.२) सकाळी सहा ते रात्री १२ वाजेपर्यंत पालिका प्रशासनाकडून केली जाणार आहेत. त्यामुळे कल्याण डोंबिवली पालिकेच्या पाणी पुरवठा विभागाने कल्याण, डोंबिवली, टिटवाळा-मांडा शहरांचा पाणी पुरवठा गुरुवारी अठरा तास बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. कल्याण, डोंबिवली शहरांना उल्हास नदीतून पाणी पुरवठा केला जातो. या नदीतून उचललेले अशुध्द पाणी कल्याणमधील बारावे, मोहिली, डोंबिवली जवळील नेतिवली, टिटवाळा येथील जलशुध्दीकरण केंद्रात आणले जाते. तेथे या पाण्यावर शुध्दीकरणाची प्रक्रिया करून मग हे पाणी नागरी वस्तीत पिण्यासाठी सोडले जाते. कल्याण, डोंबिवली



शहर परिसराला दररोज सुमारे ३४० दशलक्ष लीटर पाण्याचा पुरवठा पालिकेकडून केला जातो.पालिका हद्दीतील विविध भागातील जलवाहिन्या रस्ते कामे आणि इतर कारणांमुळे काही ठिकाणी फुटल्या आहेत. या जलवाहिन्यांमधून रस्त्यावरून पाणी वाहत असते. या जलवाहिन्या दुरुस्तीची कामे पाणी पुरवठा बंद केल्याशिवाय कामगारांना करता येत नाहीत. गळक्या जलवाहिन्या दुरुस्तीची कामे या पाणी पुरवठा बंदच्या काळात केली जाणार आहेत, असे पालिका पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक घोडे यांनी सांगितले.

# सिद्धार्थ जाधवच्या पत्नीचा नवा व्यवसाय! तृप्तीने अलिबागमध्ये सुरू केला सुंदर Homestay



नवीन वर्षात काहीतरी वेगळं, हटके करायचं असं स्वप्न प्रत्येकाचं असतं. अशाच अनेक आशा-आकांशा घेऊन संपूर्ण जगभरात २०२५ या नवीन वर्षांचं स्वागत करण्यात आलं. सामान्य लोकांप्रमाणे सेलिब्रिटींनी सुद्धा आपल्या कुटुंबांसह वेळ घालवत या नव्या वर्षाची सुरुवात केली. तर, काही कलाकारांनी वर्षाच्या पहिल्याच दिवशी आपल्या चाहत्यांना आनंदाच्या बातम्या दिल्या आहेत. मराठी कलाविश्वातील लोकप्रिय अभिनेता सिद्धार्थ जाधवने देखील आपल्या तमाम चाहत्यांबरोबर नुकतीच एक गुडन्यूज शेअर केली आहे. अभिनेत्याच्या पत्नीने या नवीन वर्षात स्वत:चा नवा व्यवसाय सुरू केला आहे. २०२४ च्या डिसेंबर महिन्यात सिद्धार्थची पत्नी तृप्तीने सोशल मीडियावर 'Something New Coming' अशी पोस्ट शेअर करत चाहत्यांना नव्या बिझनेसची हिंट दिली होती. आता तृप्तीने तिच्या नव्या व्यवसायाची पहिली झलक सर्वांना दाखवली आहे.

तृप्ती ही बिझनेसवुमन म्हणून ओळखली जाते. काही वर्षांपूर्वी तृप्तीने 'स्वइरा' हा तिचा कपड्यांचा ब्रँड लॉन्च केला होता. यानंतर आता तृप्तीने आणखी एका क्षेत्रात पाऊल ठेवलं आहे. अलिबागमध्ये तिने सुंदर असा होमस्टे सुरू केला आहे. 'तृप्ती कॉटेज' असं तिच्या नव्या व्यवसायचं नाव आहे. अलिबागला जाणारे पर्यटक या होमस्टेमध्ये राहू शकतात.

# प्रसिद्ध मराठी अभिनेत्रीने ३१ डिसेंबरला बांधली लग्नगाठ, पारंपरिक पद्धतीने पार पडला सोहळा



मराठी अभिनयविश्वात लगीनघाई सुरू आहे. अनेक कलाकारांनी २०२४ मध्ये आयुष्यात जोडीदार निवडून नवीन इनिंगला सुरुवात केली. मराठी सिनेविश्वातील लोकप्रिय अभिनेत्री पूजा सावंत, अभिनेत्री स्नेहा चव्हाण, मालिकाविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री रेश्मा शिंदे, किरण गायकवाड-वैष्णवी कल्याणकर, निखिल राजेशिर्के, शाल्व किंजवडेकर यांसह अनेक मराठी कलाकार २०२४ मध्ये लग्नबंधनात अडकले. आता मराठी टीव्ही मालिकांमध्ये काम करणाऱ्या एका अभिनेत्रीने २०२४ वर्षाच्या शेवटच्या दिवशी लग्नगाठ बांधली आहे. तिने लग्नाचे सुंदर फोटो सोशल मीडियावर शेअर करून आनंदाची बातमी दिली.

'स्वराज्यरक्षक संभाजी' या मालिकेतील अभिनेत्री तेजस्विनी सुनील लग्नबंधनात अडकली आहे. तेजस्विनीने श्रीराम निजामपूरकरशी मंगळवारी (३१ डिसेंबर रोजी) पारंपरिक पद्धतीने लग्नगाठ बांधली. तिचा लग्नसोहळा पेशवाई थाटात पार पडला. तिच्या लग्नाच्या फोटोंची सध्या खूपच चर्चा आहे.

तेजस्विनीने तिच्या लग्नात हिरव्या रंगाची लाल काठ असलेली पारंपरिक नऊवारी नेसली होती. पारंपरिक दागिन्यांनी तिने तिचा लूक पूर्ण केला होता. तर नवरदेव श्रीराम निजामपूरकरही हिरव्या व पांढऱ्या रंगाचा पेशवाई पोशाख या खास दिवसासाठी निवडला होता. लग्नाची ही खास इच्छा पूर्ण झाल्याबद्दल तेजस्विनीने कॅप्शनमध्ये २०२४ या वर्षाचे आभार मानले आहेत.तेजस्विनी सुनीलने शेअर केलेल्या फोटोंवर चाहते लाइक्स व कमेंट्सचा वर्षाव करत आहेत. तिला व श्रीरामला आयुष्यातील या नवीन प्रवासासाठी चाहते शुभेच्छा देत आहेत. तेजस्विनी सुनील हिच्या कामाबद्दल बोलायचं झाल्यास ती मागील काही वर्षांपासून सिनेसृष्टीत सक्रिय आहे. तिने आतापर्यंत अनेक टीव्ही मालिकांमध्ये काम केलं आहे. तिच्या गाजलेल्या मालिकांबद्दल बोलायचं झाल्यास 'स्वराज्यरक्षक संभाजी', 'गाथा नवनाथांची,' 'काशीबाई बाजीराव बल्लाळ' या मालिकांचा समावेश आहे.

# बिग बॉस'च्या घरात आले ज्योतिषी, सदस्यांना दिली हटके नावं, वाचा टॉप-१०ची भविष्यवाणी



२०२५ या नवीन वर्षाला सुरुवात झाली आहे. या नवीन वर्षाच्या स्वागतासाठी 'बिग बॉस १८'च्या घरात खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यानिमित्ताने खास पाहुण्यांनी देखील हजेरी लावली होती. अभिनेत्री कंगना रनौत, भारती सिंह, करण कुंद्रा, मुनव्वर फारुकी, अभिषेक कुमार आणि समर्थ जुरेल यांच्याबरोबर टॉप-१० सदस्यांनी नवं वर्षाचं स्वागत केलं. ३१ डिसेंबरच्या भागात ज्योतिषीदेखील आले होते. त्यांनी टॉप-१० सदस्यांना हटके नावं देत, त्यांची भविष्यवाणी सांगितली. ज्योतिषी प्रदीप किराडू 'बिग बॉस'च्या घरात आले होते. यावेळी त्यांनी सुरुवातीलाच शिल्पा शिरोडकरची भविष्यवाणी सांगितली. शिल्पाला त्यांनी 'मशिन' असं नावं देऊन सांगितलं की, तू तुझं आयुष्य मुलं आणि कुटुंब सुधारण्यासाठी लावतं आहेस, हे करू नकोस. ते स्वतःचं आयुष्य, ग्रह ते स्वतः घेऊन आले आहेत. येणारे तीन-चार वर्ष तुझ्यासाठी खूप चांगले आहेत. त्यामुळे जोरात कामाला लाग. अभिनय क्षेत्रात पुन्हा कामाला सुरुवात कर. त्यानंतर चाहत पांडेची भविष्यवाणी सांगितली. तिला 'गाय' असं नावं दिलं होतं. ज्योतिषी प्रदीप म्हणाले, "गाय दोन प्रकारे असतात. एक शिंगवाली आणि दुसरी शिंग नसलेली गाय. तू शिंग असलेली गाय आहेस. दिवसभर इकडे तिकडे फिरणार आणि त्यानंतर दूध दुसरंच कोणीतरी काढून नेणार. अशा प्रकारे इकडे-तिकडे भटकणं बंद कर.

# आई कुठे काय करते' फेम अभिनेत्रीने पोपटी पार्टी करत केले नवीन वर्षाचे स्वागत



'आई कुठे काय करते' फेम अभिनेत्री अश्विनी महांगडे सातत्याने चर्चेत असलेली दिसते. सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिनेत्री चाहत्यांच्या संपर्कात असलेली दिसते. सोशल मीडियावर अनेकदा ती फोटो, रील शेअर करत असते. नुकतीच तिची सहकलाकार कौमुदी वलोकर लग्नबंधनात अडकली. तिच्या संगीत सोहळयात अश्विनीने केलेल्या डान्सने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. अश्विनी व कौमुदी या दोघीही 'आई कुठे काय करते' मालिकेत दिसल्या होत्या. या दोन्ही अभिनेत्री अनेकदा एकमेकींविषयीच्या भावना व्यक्त करताना दिसतात. आता मात्र अभिनेत्रीने सोशल मीडियावर नवीन वर्षानिमित्त एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये तिने नवीन वर्षाचे स्वागत कसे केले हे पाहायला मिळत आहे. हा व्हिडीओ शेअर करताना अभिनेत्रीने एक खास संदेश लिहिला. हा संदेश चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसत आहे.

अभिनेत्री अश्विनी महांगडेने सोशल मीडियावर एक व्हिडीओ शेअर केला आहे, ज्यामध्ये अभिनेत्री तिच्या कुटुंबाबरोबर पोपटी पार्टी करताना दिसत आहे. अश्विनी तिच्या कुटुंबासह नवीन वर्षाचे स्वागत करत आहे. अभिनेत्रीने या व्हिडीओला कॅप्शन देत लिहिले, "आनंद साजरा करायला कारण शोधायचे आणि तो क्षण आपल्या कुटुंबासोबत साजरा करायचा. सगळ्यात महत्त्वाचे हे की, आई-वडील आपल्या येण्याकडे डोळे लावून बसतात तर त्यांना वेळ द्या. इंग्रजी नवीन वर्षाच्या खूप शुभेच्छा." पुढे तिने २०२४ या वर्षाला धन्यवाद असे म्हणत २०२५ चे स्वागत केले आहे. शेवटी अभिनेत्रीने एक टीप लिहिली आहे ती अशी, "बापरे तुम्ही हे वर्ष साजरे करता, मग कसला मराठीचा आदर, असे प्रश्न पडत असतील तर पोस्ट पुढे ढकलून मोकळे व्हा."

# 'गुलाबी साडी' म्हणत थिरकल्या आशाताई



आशा भोसले यांच्या आवाजाचा चाहता नाही असा माणूस शोधून सापडणं कठीण. वयाच्या ९१व्या वर्षीही आशाताईंचा उत्साह तरूण पिढीला लाजवेल असा आहे. ९० च्या दशकातील अनेक सुपरहिट गाणी त्यांनी गायलेली आहेत. 'रेशमाच्या रेघांनी'सारख्या लावणीपासून ते 'पिया तू अब तो आ जा' सारख्या कॅब्रेपर्यंत अनेक प्रकारची गाणी त्यांनी गायली आहेत. नुकत्याच एका कॉन्सर्टमध्ये त्यांनी आजच्या युगातील ट्रेंडिंग गाणी गाऊन सर्वांनाच थक्क केलं आहे.२०२४ मध्ये ट्रेंडिंग ठरलेलं संजू राठोडचं 'गुलाबी साडी हे गाणं सोशल मीडियावर तुफान व्हायरल झालं. सैर्वसामान्यांपासून ते इन्स्टाग्राम इंफ्लुएर्स आणि मोठमोठ्या बॉलीवूड सेलिब्रिटीपर्यंत प्रत्येकाने या गाण्यावर भरमसाठ रील्स तयार करण्यात आल्या. अनेकांना या गाण्याने अक्षरश: वेड लावलं. या गाण्याची क्रेझ परदेशातही होती. बॉलीवूड धकधक गर्ल माधुरी दीक्षितपासून ते आफ्रिकेच्या किली पॉलपर्यंत सर्वांनी या गाण्यावर जबरदस्त डान्स केल्याचं आपण या वर्षभरात पाहिलं आहे. आता या गाण्याने चक्क आशा भोसलेंनाही भुरळ घातली आहे. नुकत्याच झालेल्या आशाताईंच्या लाइव्ह कॉन्सर्टमध्ये त्यांनी संजू राठोडचं गुलाबी साडी हे गाणं गायलं.

# अभिनेते राजू पटवर्धन यांचे निधन



अभिनेते आणि नाट्यपरिषद ठाणे शाखेचे सक्रिय कार्यकर्ते राजू पटवर्धन यांचे मंगळवारी (दि. ३१) अल्पशा आजाराने निधन झाले ते ६५ वर्षांचे होते. गेली काही वर्षे ते डोंबिवली येथील भरारी विकलांग संस्थेत रहात होते. अलीकडेच त्यांना डोंबिवली इथल्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. तिथेच बुधवार (दि.१ जानेवारी) आज सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली. एक अभिनेता म्हणून संगीत रंगभूमी, व्यावसायिक मराठी रंगभूमी, राज्य नाट्य स्पर्धा तसेच अनेक दूरदर्शन मालिकांतून त्यांनी विविध भूमिका केल्या. थ्री इडियटस, व्हेंटीलेटर या चित्रपटातील भूमिकांमुळे त्यांना खूप प्रसिद्धी मिळाली. नाट्य परिषद, ठाणे शाखेच्या नाटकातून त्यांनी भूमिका केल्या, पं. राम मराठे संगीत महोत्सवात त्यांनी अनेक वर्ष दिग्गज कलावंतांना तानपुऱ्याची साथ त्यांनी केली.

# वैदेही परशुरामीचा लाइफ मंत्रा काय आहे?



'वेड लावी जीवा' या चित्रपटातून वैदेही परशुरामीने अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यानंतर 'वजीर', 'कोकणस्थ', 'सिम्बा', 'लोच्या झाला रे', 'फ्रेंडशिप अनलिमिटेड', 'जग्गू आणि ज्युलिएट', 'झोंबिवली', 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर', 'एक दोन तीन चार, 'वृंदावन' अशा मराठीसह हिंदी चित्रपटांतून अभिनेत्रीने भूमिका साकारल्या आहेत. आता अभिनेत्री 'संगीत मानापमान' या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर' या चित्रपटानंतर ती पुन्हा एकदा सुबोध भावेंबरोबर स्क्रीन शेअर करणार आहे. आता एका मुलाखतीत वैदेहीने तिचा लाइफ मंत्रा काय आहे, यावर वक्तव्य केले आहे.

वैदेही परशुरामीने नुकतीच 'राजश्री मराठी'ला मुलाखत दिली. या मुलाखतीत तिला तिचा लाइफ मंत्रा काय आहे, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना अभिनेत्रीने म्हटले, "मी बऱ्याचदा कृतज्ञतेविषयी बोलते. माझे व्यक्तिमत्त्व ती महत्त्वाची भूमिका निभावते." मंत्राबाबत बोलायचे, तर मी कायम एक तत्त्व पाळत आली आहे. असं काही करू नका; ज्याचा शेवट पश्चात्तापाने होईल आणि एकदा जर तुम्ही एखादी गोष्ट केली, तर मग पश्चात्ताप करू नका. मला असं वाटतं की, ही गोष्ट माझ्याबरोबर कायम आहे आणि ती पुढे तशीच राहावी.'संगीत मानापमान'च्या सेटवर अनेक सीनियर कलाकार आहेत. तर काम करताना थोडाफार तणाव असतो का? यावर बोलताना वैदेहीने म्हटले, "ताण म्हणणार नाही; पण ती एक धाकधूक कायमच असते. प्रत्येक सिनेमा खूप गोष्टी शिकवून जातो. मला असं वाटतं की, प्रत्येक सिनेमा व प्रत्येक व्यक्तीकडून काही ना काही शिकायला मिळतं. काय करावं, काय करू नये हे सगळंच सातत्यानं शिकायला मिळतं. आता मला असं वाटतं की, हळूहळू चांगल्या माणसांबरोबर काम करून माझ्या हे लक्षात आलंय की, हे दडपण असणं चांगली गोष्ट आहे. फक्त त्या दडपणाचं रूपांतर आत्मविश्वासात व्हायला हवं. जे अनुभवाने थोडं थोडं जमायला लागलं आहे. दडपण १०० टक्के होतं. 'आणि डॉ. काशिनाथ घाणेकर'नंतर सुबोध भावे, सुमित राघवन यांच्याबरोबर पुन्हा एकदा काम करायचंय. इतक्या वर्षांत कलाकार म्हणून प्रत्येकात बदल होत असतात. माझ्यातही झालेत. तर ते पहिलं पाऊल थोडंसं दडपण देणारं होतं. पण मला असं वाटतं की, सगळेच इतके कमाल कलाकार आहेत. इतकी चांगली माणसं आहेत, ते सेटवर सगळं निघून जातं.

# यंदाही बॉलिवुडपेक्षा साऊथच ठरणार वरचढ, 'हे' दमदार ५ चित्रपट सलमान, शाहरुखलाही टाकणार मागे?



मुंबई : बॉलिवुडसाठी २०२४ हे साल फारचे चांगले राहिले नाही. मोठा गल्ला जमवणारा तसेच जागतिक पातळीवर नावाजला गेलाला कोणताही सिनेमा बॉलिवुडमध्ये आला नाही. अर्थात याला लापता लेडीज या चित्रपटासारखे काही अपवाद आहेत. पण २०२४ या साली बॉलिवुडच्या तुलनेत दाक्षिणात्य सिनेसृष्टीने मात्र चांगलाच डंका वाजावला. दाक्षिणात्य सिनेमांनी गेल्या वर्षी फक्त भारतच नव्हे तर जगभरात नाव कमवले. या चित्रपटांनी परदेशातही अनेक अवॉर्ड्स मिळवले. दरम्यान, २०२५ सालावरही राज्य करण्यासाठी दाक्षिणात्य सिनेसृष्टी सज्ज झाली आहे. कारण या वर्षी अनेक मोठे आणि दमदार दाक्षिणात्य सिनेमे प्रदर्शित होणार आहेत. या वर्षी पाच मोठे दाक्षिणात्य चित्रपट रिलीज होणार आहेत. या सर्वच चित्रपटांची देशभरात मोठ्या आतुरतेने वाट पाहिली जात आहे. हे पाच चित्रपट खालीलप्रमाणे आहेत.

### कांतारा चॅप्टर-१

यातील पहिला चित्रपट हा कांतारा चॅप्टर-१ हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. कांतारा हा चित्रपट २०२२ साली प्रदर्शित झाला होता. त्यानंतर आता दिग्दर्शक ऋषभ शेट्टी कातांरा-२ म्हणजेच कांतारा चॅप्टर-१ या चित्रपटावर काम करतोय. हा चित्रपट येत्या २ ऑक्टोबर रोजी प्रदर्शित होणार आहे.

### २. गेम चेंजर

RRR यासारख्या ब्लॉकबस्टर चित्रपटांत काम करणाऱ्या तसेच मोठी फॅन फॉलोविंग असणाऱ्या राम चरणचा गेम चेंजर हा चित्रपट याच वर्षी येणार आहे. गेम चेंजर या चित्रपटात राम चरण हा राजकीय सल्लागाराची भूमिका बजावतो आहे.या चित्रपटात अभिनेत्री कियारा अडवाणीदेखील दिसणार आहे. १० जानेवारी रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

### ३. राजा साहब

'बाहुबली' या चित्रपटानंतर प्रभासचा एकही बॉकबस्टर चित्रपट आलेला नव्हता. मात्र २०२४ साली प्रदर्शित झालेल्या 'कल्की २८९८ AD' या चित्रपटाने मात्र बॉक्स ऑफिसवर चांगलाच गल्ला जमवला. त्यानंतर आता २०२५ साली प्रभासचा 'राजा साहब' हा चित्रपट येणार आहे. हा चित्रपट हॉरर, कॉमेडी आहे. या चित्रपटात प्रभास भूत-प्रेतांसोबत लढताना दिसणार आहे. १० एप्रिल २०२५ रोजी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे.

### ४. ठग लाइफ

या चित्रपटाचे दिग्दर्शन मणिरत्नम करणार आहेत. या चित्रपटात कमल हसन प्रमुख भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटाच्या निमित्ताने हो दोन्ही दिग्गज तब्बल ३६ वर्षांनी एकत्र काम करत आहेत. हा एक गँगस्टर ड्रामा आहे. कमल हसन यांचा २०२४ साली 'इंडियन २' हा चित्रपट प्रदर्शित झाला होता. त्यानंतर आता त्यांचा २०२५ साली 'ठग लाइफ' हा चित्रपट येतोय. हा चित्रपट ५ जून २०२५जी प्रदर्शित होणार आहे.




**मेष** – महत्त्वाची रेंगाळलेली कामे होतील. उत्साह वाढेल. नाराज झालेल्यांना खूश करता येईल. धंदा वाढेल. प्रकृतीची काळजी घ्यावी.

**वृषभ** – अनुभवी माणसांचा सल्ला उपयोगी येईल. सर्वांचे सहाय्य घेता येईल. मोठ्यांचा मान राखा. मैत्री होईल. सावधपणे गुंतवणूक करावी.

**मिथुन** – व्यवसाय, नोकरीत प्रतिष्ठा प्राप्त होईल. नवीन योजना राबवता येतील. नवीन ओळख झाली तरी मोहात पडू नका. सावध राहा.

**कर्क** – आपल्या धंद्यात वाढ करू शकाल. तुमचा विचार इतरांना पटवून देता येईल. कठीण काम करा. निष्कारण वाद वाढवू नका.

**सिंह** – व्यवसायात अनुकूल ग्रहमान राहील. अडचणींवर मात करू शकाल. नवीन संधी उपलब्ध होतील. आपल्या रागावर ताबा ठेवावा.

**कन्या** – गैरसमज टाळण्याचा प्रयत्न करावा. आपला प्रभाव पडेल. आपल्या धंद्यात वाढ होईल. भागीदाराबरोबर चर्चा यशस्वी होईल.

**तूळ** – कौटुंबिक समस्या सोडवाल. नातेवाईकांशी, आप्तेष्टांशी भेटीचे योग आहेत. कुणालाही कमी लेखू नका. तुमचे विचार योग्य ठरतील.

**वृश्चिक** – नोकरीत वरिष्ठांची मदत मिळेल. नवीन काम मिळवता येईल. खर्चावर बंधने घाला. राग वाढवू नका. सर्वांशी सुसंवाद राहील.

**धनु** – धंद्यात फायद्याचे काम मिळेल. कुठल्याही स्वरूपाचे वादविवाद टाळावेत. चर्चा यशस्वी होईल. निर्णय अचूक ठरेल. जुने मित्र भेटतील.

**मकर** – कामात तत्परता दाखवाल. आपला प्रभाव पडेल. स्पर्धा जिंकता येईल. ओळखी वाढतील. वसुली करा. भावंडांशी वादविवाद टाळावेत.

**कुंभ** – आर्थिक स्थिरता लाभेल. अनेक कामे करण्याचा प्रयत्न त्रासदायक ठरेल. मनाची द्विधा अवस्था होईल. वेळेनुसार निर्णय घ्या.

**मीन** – महत्त्वाचा निर्णय घेताना सर्वांचा विचार करा. आपल्या कामातील अडचणी कमी होतील. अरेरावी करू नका. नेहमी नम्रपणे बोला.

# मुंबईतील २६/११ हल्ल्यातील मास्टरमाईंड तहव्वूर राणाला भारतात आणणार

## अमेरिकी कोर्टाचा निकाल





मुंबई (विशाल कारंडे) : मुंबईतील भ्याड असा २६/११ दहशतवादी हल्ला डोळ्यासमोर आल्यास आजही अंगावट शहारे उमटतात. या हल्ल्यात पोलिसांसह अनेकांना आपला जीव गमवाव लागला होता. अशात या हल्ल्यासंदर्भातील एक माहिती समोर येत आहे. त्यानुसार, २६/११ दहशतवादी हल्ल्यात सहभागी असलेला पाकिस्तानी वंशाचा कॅनडाचा व्यापारी तहव्वूर राणा याला लवकरच भारताच्या ताब्यात दिले जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तहव्वूर राणा याला भारतात आणण्याची प्रक्रिया राजनैतिक माध्यमातून सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२४ मध्ये, अमेरिकी कोर्टाने निर्णय दिला होता की, दोन्ही देशांमधील प्रत्यार्पण करारानुसार राणाला भारताकडे प्रत्यार्पण केले जाऊ शकते. तेव्हापासून दोन्ही देशांमध्ये बॅक चॅनेलची चर्चा सुरू आहे. त्यानंतर न्यायालयाने राणाच्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील सहभागाबद्दल भारताकडे प्रत्यार्पणाला विरोध करणारी याचिका फेटाळली. प्रत्यार्पणाचा आदेश योग्य होता हे सिद्ध करण्यासाठी भारताने राणाविरुद्ध पुरेसे पुरावे सादर केले आहेत, असे न्यायालयाने म्हटले आहे.

२६/११ च्या हल्ल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी आरोपपत्रात राणाच्या नावाचा समावेश केला होता. त्याच्यावर पाकिस्तानच्या इंटर-सर्व्हिसेस इंटेलिजन्स (ISI) आणि दहशतवादी संघटना लष्कर-ए-तैयबाचा सक्रिय सदस्य म्हणून काम केल्याचा आरोप आहे. राणाने मुंबई हल्ल्याचा मास्टरमाइंड डेव्हिड कोलमन हेडलीला मदत केल्याचेही आरोपपत्रात म्हटले आहे, ज्याने हल्ल्यासाठी मुंबईतील ठिकाणांचा शोध घेतला होता. न्यायालयाच्या म्हणण्यानुसार, भारत आणि अमेरिका यांच्यातील प्रत्यार्पण करारामध्ये नॉन-बीस इन इडेम अपवाद आहे. जेव्हा आरोपीला त्याच गुन्ह्यातून आधीच दोषी ठरवण्यात आले आहे किंवा निर्दोष मुक्त केले गेले आहे, तेव्हा हे लागू होते. राणाविरुद्ध भारतात लावण्यात आलेले आरोप हे अमेरिकी कोर्टात चाललेल्या खटल्यांपेक्षा वेगळे आहेत. त्यामुळे idem अपवादामध्ये गैर-बीआयएस लागू होत नाही.

# एटीएस ने महाराष्ट्रातील चार जिल्ह्यांमध्ये छापे टाकून ९ अवैध बांगलादेशी नागरिकांना अटक केली

मुंबई (राकेश गायकवाड) : महाराष्ट्रात दहशतवाद विरोधी पथक (एटीएस) कार्यरत झाले असून, एटीएसचे पथक विविध ठिकाणी माहितीच्या आधारे अवैध बांगलादेशींवर सातत्याने छापे टाकत आहेत. तसेच त्यांच्यावर कारवाई केली. या कालावधीत एटीएसने गेल्या चार दिवसांत ११ जिल्ह्यांमध्ये छापे टाकले आहेत. अशीच एक कारवाई नुकतीच अधिकाऱ्यांनी मंगळवारी केली आणि सांगितले की, महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) बांगलादेशातील नऊ नागरिकांना बेकायदेशीरपणे भारतात प्रवेश करून योग्य कागदपत्रांशिवाय देशात राहण्याच्या आरोपाखाली अटक केली आहे. अधिकाऱ्याने सांगितले की, आठ पुरुष आणि एका महिलेसह नऊ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. त्यांनी सांगितले की, आरोपींनी बनावट कागदपत्रे वापरून आधार कार्ड बनवले होते.



## चार जिल्ह्यांत कारवाई

एका अधिकाऱ्याने सांगितले की, डिसेंबरमध्ये विशेष मोहिमेअंतर्गत आतापर्यंत १९ प्रकरणांमध्ये ४३ बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. ते म्हणाले की, गेल्या चार दिवसांत मुंबई, नाशिक, नांदेड, छत्रपती संभाजीनगर येथे स्थानिक पोलिसांच्या मदतीने कारवाई करण्यात आली.

SPORT

# 'Without Him Series Might Have Been One-Sided': McGrath Lauds Bumrah's Solo Efforts In BGT

**New Delhi** - The legendary Australian pacer, Glenn McGrath reckons that Jasprit Bumrah's stellar show in the ongoing Border-Gavaskar series has prevented the five-match affair from being a lopsided contest in favour of Australia.

Bumrah has been the best bowler in the series having collected 30 wickets at an average of just 12.83. But India's poor batting and lack of proper plans have let them down, resulting in the side trailing 1-2 in the series.

"He has been a massive part of the Indian team and without him, the series might have been more one-sided and what he does is special," McGrath told media persons on the sidelines of his foundation's cancer awareness event here.

The 54-year-old was a feared fast bowler during his time. McGrath has been actively involved in cancer awareness programmes after losing his wife to the disease back in 2008. The former Australian international has been following the ongoing series and remains in awe of Bumrah's skills with the ball.





"Terrific young guy who has found a way to adapt. Absolutely incredible how he powers into bowl the last few steps," McGrath said of Bumrah's short run-up.

The legendary bowler also saw similarities between Bumrah and himself when it comes to the hyper-extension of the bowling arm.

"Got a little bit of hyper extension which I used to have as well. He is coping with it, he has incredible control both ways, guess they are managing him well. I am a massive fan of Jasprit," said the lanky former bowler, who was nicknamed 'Pigeon' by his teammates for his thin legs.

The World Cup winner has also worked with the MRF Pace Foundation in Chennai and remains impressed with the talents that are being produced within the country. He also tipped Prasidh Krishna to have a bright future in the bowling side of things.

"India, with 1.4 billion people, has absolute passion for the game of cricket. Working with MRF Pace Foundation for the last 12 years, we have Prasidh Krishna, who is in the squad," he commented.

"He is a good young bowler and I think, they will have a good career ahead of him. There's no shortage of players and (it is) not just the bowlers but also batters like Yashasvi Jaiswal. What's good about these young players is they are fearless. We have got Sam Konstas who is similar," he added.



## Ex-cricketers shocked by dressing room leaks from Australia Tests

**New Delhi** - Former cricketers Irfan Pathan and Sreevats Goswami have criticised leaks from the Indian dressing room during the Border-Gavaskar Trophy, following a report by The Indian Express detailing coach Gautam Gambhir's scathing remarks after the Boxing Day Test defeat to Australia.

Pathan emphasised that dressing room conversations are sacred and should remain confidential, while Goswami condemned the breach, calling it "not on."

According to the report, Gautam Gambhir delivered a no-nonsense address to the team after their 184-run defeat in the Boxing Day Test, saying he "has had enough". Gambhir, visibly frustrated, reportedly criticised the players for prioritising their "natural game" over the needs of the situation. Without naming individuals, he expressed his disappointment at the lack of adaptability, making it clear that such an approach was no longer acceptable.

The report further states that Gambhir, who assumed the coaching role in July, admitted to giving the players freedom over the past six months but announced a stricter stance moving forward. He warned that players unwilling to adhere to his pre-determined team strategies would be shown the door, signalling a significant shift in his approach to managing the squad.

The team management, led by head coach Gautam Gambhir and captain Rohit Sharma, has come under intense scrutiny following India's recent poor results in Test cricket. India suffered a historic 0-3 whitewash at home against New Zealand in October-November, marking their first-ever clean sweep in a home Test series.

## Jasprit Bumrah named captain, Cummins ignored in Australian media's Test Team of 2024

**New Delhi** - Star India fast bowler Jasprit Bumrah has been named captain of the Test team of 2024 by cricket.com.au. Notably, Bumrah had a phenomenal year with the ball as he finished as the highest wicket-taker in Tests with 71 wickets from 13 matches (26 innings) at an average of 14.92 with 5 five-wicket hauls to his name.

The Indian pace spearhead has been making giant strides in international cricket with his performances as he recently became the bowler with the best bowling average with more than 200 wickets. He's also the leading wicket-taker of the ongoing Test series against Australia with 30 scalps to his name from four matches at an average of 12.83 with three five-wicket hauls to his name.



Hence, Bumrah has been rewarded for his marvellous show with the captaincy of the team. Apart from him, Yashasvi Jaiswal has been also picked as the opener for his tremendous exploits with the bat in the year. Jaiswal finished the year as the second-highest run-scorer of the year with 1478 runs from 15 matches (29 innings) at an average of 54.74 with nine fifties and three centuries. Meanwhile, Australia captain Pat Cummins failed to make it to the XI. Cummins had a good year with the ball with 37 scalps from nine matches (18 innings) at an average of 24.02 with two five-wicket hauls. With the bat, he scored 306 runs with one half-century.

Apart from Cummins, only Alex Carey and Josh Hazlewood were the two Australians in the team. Ben Duckett, Joe Root, Rachin Ravindra, Harry Brook, Kamindu Mendis, Matt Henry and Keshav Maharaj also made it to the team. Cricket.com.au's Test team of the Year for 2024: Yashasvi Jaiswal, Ben Duckett, Joe Root, Rachin Ravindra, Harry Brook, Kamindu Mendis, Alex Carey(WK), Matt Henry, Jasprit Bumrah (C), Josh Hazlewood, Keshav Maharaj.

## Rohit Sharma And Gautam Gambhir Set For Showdown Talks With BCCI After BGT: Report

**New Delhi** - Rohit Sharma's performance has been under severe scrutiny after India's shambolic defeat in the Melbourne Test. Alongside Rohit, questions have been raised over Gautam Gambhir's credentials as head coach of the Indian Cricket Team. Rohit has endured very poor outings in the ongoing Border Gavaskar Trophy having mustered only 31 runs in the last 5 innings on Australian soil. His underwhelming batting form might have affected his judgement as the leader as some of his on-field decisions have also faced questions. As per several reports Ajit Agarkar has had talks with Rohit in a bid to steady the boat. But according to a Cricbuzz report, no such talks have taken place and all the discussions will be held after the BGT. The reports also added that unless Rohit makes himself unavailable for the 5th Test, he will lead the team in Sydney. Rohit admitted that things haven't gone their way. As quoted by Cricbuzz he said, "I stand where I am standing today. "There's nothing to think about what has happened in the past. Obviously, few results haven't gone our way. As a captain, yes, that is disappointing."Yes, as a batter as well, a lot of things that I am trying to do are not falling into place. But, mentally, it's disturbing without a doubt. If you have come here, you want to successfully do what you are supposed to. If those things don't fall in place, that's a big disappointment."Not only Rohit, but Gautam Gambhir's role is also under focus as per the report. The former KKR captain replaced Rahul Dravid at the helm, but it has been a rocky start. Following the 3-0 thrashing at the hands of New Zealand at home, India's performance in Australia has also not been satisfactory. Ravichandran Ashwin's sudden retirement also sparked major doubts but it has emerged Gambhir didn't have any kind of involvement behind Ashwin's mid-series retirement. However, he will be asked to simplify the matter in the near future.



# सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी करण्यास ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय - पणन मंत्री जयकुमार रावल

● मुंबई, यश सावंत :

राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दिलासा देण्याकरिता सोयाबीन खरेदीसाठी नोंदणी करण्यास दिनांक ६ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आल्याची घोषणा पणन मंत्री जयकुमार रावल यांनी केली. पणन विभागाचा पदभार स्वीकारल्यानंतर मंत्री जयकुमार रावल यांनी विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला. विभागाचे कामकाज गतीने करण्यासाठी या बैठकीत विविध निर्णय घेण्यात आले. बैठकीस पणन विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, पणन संचालक विकास रसाळ, उपसचिव संतोष देशमुख आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पणन मंत्री रावल म्हणाले की, राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी, लोकप्रतिनिधी यांची मागणी लक्षात घेता सोयाबीन खरेदी नोंदणीची मुदत सात दिवसांनी म्हणजेच ६ जानेवारी २०२५ पर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वीच्या निर्णयानुसार ही मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. आता सोयाबीनच्या खरेदीसाठी ६ जानेवारीपर्यंत नोंदणी सुरू राहणार आहे. तसेच नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी नाफेड आणि एनसीसीएफ यांच्यामार्फत १२ जानेवारीपर्यंत केली जाणार आहे, अशी महिती देखील मंत्री रावल यांनी दिली.





मंत्री रावल पुढे म्हणाले की, किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत राज्यात सोयाबीनची खरेदी ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल या हमीभावाने सुरू आहे. आतापर्यंत सोयाबीनची तीन लाख ३४ हजार ३३१ मेट्रिक टन एव्हढी विक्रमी खरेदी झाली आहे. मागील वर्षी केवळ ७ हजार ४०० क्विंटल एवढी खरेदी झाली होती. यावर्षी शेतकऱ्यांना एक हजार कोटी रुपये मोबदला देण्यात आला आहे. राज्यात सध्या ५६१ खरेदी केंद्र सुरु असून आतापर्यंत ६ लाख ६९ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. शेतकऱ्यांना हमी भाव, तर ग्राहकांना रास्त दरात माल मिळाला पाहिजे यासाठी विभागाच्या माध्यमातून यापुढे प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्यासाठी प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती असली पाहिजे यासाठी प्रयत्न केला जाईल. त्याअंतर्गत आदिवासी भागातील तालुक्यांवर भर देण्यात येईल, या भागात शेतमालाची खरेदी-विक्री करण्यासाठी व्यापाऱ्यांना प्रोत्साहित केले जाईल, अशी माहिती श्री. रावल यांनी दिली.

■ पणन विभागामार्फत शेतकरी हिताचे धोरण आखण्यात येणार आहे. सोयाबीन, धान, कापूस यासारख्या पिकांना हमीभाव मिळवून देण्यासह कांद्यासारख्या नाशवंत पिकांना रास्त भाव मिळण्यासाठी पुढाकार घेण्यात येईल. त्यासाठी जगातील उत्तम बाजार व्यवस्थेचा अभ्यास करून तेथील अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा आपल्या राज्यात वापर करण्यात येणार आहे. बाजार समित्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे वर्गीकरण करण्यासह त्यांचे बळकटीकरण केले जाईल, अशी ग्वाही रावल यांनी दिली.


■ नवी मुंबई येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायापालट केला जाणार आहे. आशियातील अग्रेसर बाजार समिती म्हणून तिचा लौकिक होण्यासाठी जगातील उत्तमोत्तम व्यवस्था याठिकाणी राबविण्यात येणार आहे. शेतकरी, हमाल, मापारी, व्यापारी यासारख्या सर्व संबंधित घटकांचा विचार केला जाणार आहे, असा मानस देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

■ राज्यात शीतगृहांची उभारणी, गोदामांची निर्मिती- गाव तेथे गोदाम, माथाडी कामगार कायदा, शेतमालांची आयात-निर्यात, बाजार समित्यांना मिळणारा सेस, राज्यातील पीक पद्धती, दांगट समितीचा अहवाल, बाजार समिती सभापतींची परिषद यासारख्या बाबींचाही मंत्री जयकुमार रावल यांनी यावेळी आढावा घेतला.

# सलून-ब्युटी पार्लर सेवा २० ते २५ टक्क्यांनी महागली

● मुंबई, विशाल पाटील :

२०२४ या सरत्या वर्षाला निरोप दिल्यानंतर आजपासून २०२५ या नवीन वर्षाची सुरूवात झाली आहे. सध्या सर्वत्र उत्साहाचे आणि आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे. पण वर्ष २०२५ मध्ये नागरिकांच्या या आनंदाला महागाईचं विरजण लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कारण, नुकाताच महाराष्ट्र राज्य सलून व ब्युटी पार्लर असोसिएशनने दरवाढीचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे केसं कापण्यासाठी किंवा ब्युटी पार्लरसाठी अधिकचे पैसे मोजावे लागणार आहेत.



नववर्षाच्या पहिल्याच दिवशी सर्वसामान्यांना मोठा झटका बसला आहे. सलून आणि ब्युटी पार्लरच्या सेवेत दरवाढ करण्यात आली आहे. या सेवेमध्ये तब्बल २० ते २५ टक्क्यांनी दरवाढ करण्यात आली आहे. त्यामुळे आता सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागणार आहे. राज्यातील ग्रामीण व शहरी भागात देण्यात येणाऱ्या सुविधांनुसार दरवाढीचा निर्णय घेण्यात आला असल्याचे असोसिएशनने सांगितले. सलून व ब्युटी पार्लर सेवेत वाढ केल्याची माहिती नाभिक समाज नेते व सलून ब्युटी पार्लर असोसिएशनचे अध्यक्ष सोमनाथ काशिद यांनी दिली आहे. त्यानुसार, "सलून आणि ब्युटी पार्लरच्या दरांमध्ये साधारणपणे २०ते २५टक्के दरवाढ असणार आहे. वाढती महागाई, जीएसटी, इन्कम टॅक्स, प्रोफेशनल टॅक्स, महानगरपालिकेची वाढती लायसन्स फी, सलूनमधील उपयोगी वस्तूंचे दर वाढले, वाढत चाललेले हप्ते या सर्व कारणांमुळे दरवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला", असे सोमनाथ काशिद यांनी सांगितले. परिणामी, १ जानेवारी २०२५ पासून म्हणजे बुधवारपासूनच पार्लर आणि सलूनमध्ये जाण्याकरीता जास्त पैसे मोजावे लागणार आहे.

# संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना अटक करा - मस्साजोगच्या ग्रामस्थांचे जलसमाधी आंदोलन

● बीड, दिगंबर जाधव :

खंडणी प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडच्या अटकेनंतर मस्साजोग ग्रामस्थांनी तीन फरार असलेल्या आरोपींच्या अटकेची मागणी लावून धरली आहे. सरपंच संतोष देशमुख प्रकरणाशी संबंध असलेले तीन आरोपींना अटक करा, अशी मागणी करत मस्साजोग ग्रामस्थांनी आज जलसमाधी आंदोलन केले. पवन ऊर्जा प्रकल्पाच्या खंडणी प्रकरणाच्या गुन्ह्यातील आत्मसमर्पण केलेला वाल्मिक कराड याला केज न्यायालयानं १५ दिवसांची सीआयडी कोठडी सुनावली आहे. बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची सुदर्शन घुले आणि त्यांच्या साथीदारांनी दिनांक ९ डिसेंबर रोजी अपहरण करून अत्यंत निर्घृणपणे हत्या केली. या प्रकरणाशी वाल्मिक कराडचा थेट संबंध असल्याचा विरोधी पक्षाच्या नेत्यांनी आरोप केला. २९ नोव्हेंबर २०२४ रोजी मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असलेल्या वाल्मिक कराडनं पवनउर्जा कंपनीच्या अधिकाऱ्याकडं खंडणी मागितली होती. या प्रकरणी कंपनीचे अधिकारी सुनील शिंदे यांनी ११ डिसेंबरला पोलिसात तक्रार दिली होती. या प्रकरणी पोलिसांनी वाल्मिक कराड आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी तालुकाध्यक्ष विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांच्यासह तिघांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला होता. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर वाल्मिक कराड फरार होता. पोलिसांनी कारवाईचा आवळलेला फास आणि सीआयडीकडून सुरू असलेला चौकशीचा ससेमिरा सुरू असताना त्यानं ३१ डिसेंबरला पुण्यातील सीआयडी कार्यालयात आत्मसर्मपण केलं.



# नववर्षाच्या पहिल्या दिवशी भाविकांची दर्शनासाठी गर्दी



● पुणे, अभिजीत येरल्लू :

नववर्षाच्या पहिल्या दिवशी भाविकांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली. शहर, तसेच उपनगरातून भाविक मोठ्या संख्येने दर्शनासाठी आल्याने छत्रपती शिवाजी रस्ता, बाजीराव रस्ता तसेच परिसरातील गल्ली बोळात कोंडी झाली. नववर्षाच्या पहिल्या दिवशी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात शहर, उपनगर तसेच जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. छत्रपती शिवाजी रस्त्यासह लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता, केळकर रस्ता परिसरात वाहतूक कोंडी झाल्याचे पाहायला मिळाले. अप्पा बळवंत चौक ते बुधवार चौक (हुतात्मा चौक) दरम्यानचा रस्ता वाहतुकीस बंद करण्यात आला होता. बाजीराव रस्त्यावरील वाहतूक विस्कळीत झाली होती. दर्शनासाठी आलेल्या अनेकांनी मोटारी नदीपात्रातील रस्त्यावर लावल्याने नदीपात्रातील रस्त्यावरील मोटारींच्या रांगा लागल्याचे पाहायला मिळाले. मध्यभागातील गल्ली बोळात अनेकांनी दुचाकी वाहने बेशिस्तपणे लावल्याने कोंडी झाली होती. भाविकांची गर्दी रात्रीपर्यंत होती. शिवाजी रस्ता परिसरातील वाहतुकीचे नियोजन करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला होता.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळाच्यावतीने नूतन वर्षारंभानिमित्त आकर्षक सजावट करण्यात आली होती. मंदिराच्या परिसरात रंगावलीच्या पायघड्या, तसेच पुष्प सजावट करण्यात आली होती. सकाळपासून मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर, सारसबाग येथील सिद्धीविनायक मंदिर, तसेच शहरातील विविध मंदिरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.

# जळगावात मंत्री गुलाबराव पाटलांच्या कुटुंबीयांच्या गाडीवर दगडफेक

● जळगाव, सचिन कदम :

राज्याचे पाणीपुरवठा मंत्री आणि शिवसेना आमदार गुलाबराव पाटील यांचे कुटुंबीय प्रवास करत असलेल्या गाडीवर दगडफेक झाल्याची माहिती समोर येत आहे. जळगाव जिल्ह्याच्या पाळधी गावात मंगळवार ३१डिसेंबर रोजी रात्रीच्या सुमारास ही घटना घडली. वाहन चालकाने गाडीचा हॉर्न वाजल्याने आणि गाडी टच झाल्याने हा वाद झाला. काही वेळाने या वादाचे रुपांतर हाणामारीत झाले आणि पाळधी गावचे काही तरुण आणि शिवसेनेच्या काही कार्यकर्त्यांनी राडा घातला. विशेष म्हणजे हा राडा इतका भयंकर होता की, त्यात १० ते १२ दुकानं पेटवण्यात आली. परिणामी, पाळदी गावात पोलिसांकडून संचारबंदी लागू करण्यात आली आहे.



मंत्री गुलाबराव पाटील यांचे कुटुंबीय जळगावातील पाळधी गावातून कारने प्रवास करत होते. त्यावेळी रस्त्यात काही जण उभे असल्याने वाहन चालकाने हॉर्न वाजवला. त्यावेळी उपस्थित काही जणांनी शिवीगाळ करण्यास सुरूवात केली. वाहनात मंत्री गुलाबराव पाटील यांच्या पत्नी असल्याने शिवीगाळ करणाऱ्या तरुणांवर काही शिवसैनिक धावून गेले. यानंतर दोन गट आमने सामने आले आणि त्यातूनच ही दगडफेक व जाळपोळची घटना घडल्याची माहिती समोर आली आहे.

दरम्यान, या घटनेची मिळताच पोलीस पाळधी गावात दाखल झाले. तोपर्यंत जाळपोळ करणारे तरुण पळून गेले होते. पोलिसांनी गावात बंदोबस्त वाढवला असून जाळपोळीला कारणीभूत असलेल्या तरुणांची धरपकड पोलिसांकडून सुरू आहे. सद्यस्थितीत जळगावच्या पाळधी मध्ये पूर्ण शांतता असून पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. पोलिसांच्या वाहनातून लाऊड स्पीकरच्या माध्यमातून या ठिकाणच्या ग्रामस्थांना संचार बंदीबाबत सूचना देण्यात आली होती. पाळधी गावांमध्ये पहाटे सहा वाजेपर्यंत कलम १४४ अन्वये संचारबंदी लागू करण्यात आले होते. याप्रकरणी रात्री उशिरापर्यंत पाळधी पोलीस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्याचे काम सुरू होते. रात्री उशिरापर्यंत पोलिसांनी सात ते आठ संशयितांना अटक करण्यात आली.

# नव्या वर्षात सरकारकडून अधिकाऱ्यांना पदोन्नतीची भेट

● मुंबई, विशाल कारंडे :

नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला राज्य सरकारनं प्रशासकीय अधिकाऱ्यांना पदोन्नती करत नवीन वर्षाचे गिफ्ट दिलं आहे. तर आठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या आहेत. सुरज मांढरे हे यापूर्वी क्रीडा व युवक सेवा विभागाचे सचिव होते. त्यांची बदली कृषी आयुक्त पुणे या ठिकाणी करण्यात आली आहे. याचबरोबर सचिंद्र प्रताप सिंग यांची शिक्षण आयुक्त पुणे येथे नियुक्ती झाली आहे. रवींद्र बिनवडे यांची बदली नोंदणी महानिरीक्षक आणि नियंत्रक मुद्रांक शुल्क, पुणे येथे बदली करण्यात आली आहे. तर दुसरीकडे अधिकारी रुचेश जयवंशी यांना पदोन्नती देण्यात आली आहे. जयवंशी हे आता अल्पसंख्यांक विभाग मंत्रालय येथे सचिव म्हणून काम करतील. यापूर्वी ते राष्ट्रीय ग्रामीण जीवन ज्योती अभियान, नवी मुंबई येथे कार्यरत होते. त्यांना आता राज्य सरकारनं पदोन्नती दिली आहे. तसेच महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक पणन महासंघाचे संचालक ए. बी. धुळाज यांनाही पदोन्नती दिली आहे. समग्र शिक्षण अभियानाचे संचालक विमला आर यांना सुद्धा पदोन्नती देण्यात आली आहे. शितल तेली-उगले सोलापूर पालिकेच्या आयुक्त पदावर त्यांची वेतनश्रेणीत उन्नत करून पदोन्नती देण्यात आली आहे.



आयएएस अधिकारी निधी चौधरी यांनाही राज्य सरकारने पदोन्नती देण्यात आली आहे. तसेच सोनिया सेठी यांनादेखील पदोन्नती देण्यात आली आहे. त्या सध्या महसूल आणि वन विभाग मंत्रालय येथे प्रधान सचिव होत्या. त्या अपर प्रमुख्य सचिव म्हणून काम करणार आहेत. रणजीत सिंह देओल यांची प्रधान सचिव शालेय शिक्षण आणि क्रीडा विभाग मंत्रालय येथे बदली करण्यात आली आहे. तसेच माणिक गुरसाळ यांनाही पदोन्नती देण्यात आली आहे. अधिकारी प्रदीप पी. हे यापूर्वी खादी आणि ग्रामोद्योग मंडळ येथे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांची बदली आयुक्त मच्छ व व्यवसाय मुंबई येथे करण्यात आली आहे. याशिवाय डॉ. प्रशांत नारनवरे यांना पदोन्नती देण्यात आली आहे. ते महिला व बालविकास पुणे येथे आयुक्त म्हणून कार्यभार सांभाळणार आहेत. डॉ. अशोक करंजकर महाराष्ट्र राज्य वित्तीय महामंडळ येथे व्यवस्थापकीय संचालक या पदावर त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# ग्रामीण भागातील रस्त्यांची कामे पारदर्शक व गुणवत्तापूर्ण करावी

## ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे

● मुंबई, राकेश गायकवाड :

प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून तयार करण्यात येणाऱ्या रस्त्यांच्या कामात पारदर्शक व गुणवत्तापूर्ण कामाला प्राधान्य द्यावे, असे निर्देश ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे यांनी दिले.

मंत्रालयात प्रधानमंत्री ग्राम सडक योजना व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेच्या तसेच कंत्राटी कामगार वेतन थकबाकीबाबत आढावा बैठक झाली. यावेळी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे सचिव सतिश चिखलीकर, वित्तीय नियंत्रक अभय धांडे, उपसचिव प्रशांत पाटील, कार्यासन अधिकारी विवेक शिंदे, अच्युत इप्पर, विजय चौधरी उपस्थित होते. ग्रामविकास व पंचायतराज मंत्री श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतील निकषात बदल करण्यासाठी केंद्र सरकारसोबत चर्चा करण्यात येईल, जेणेकरुन कामात सुलभता निर्माण होईल. ग्रामीण भागातील रस्त्यांचे जाळे विस्तारण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करण्यात यावेत. ग्रामीण तसेच मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत पुढील कामे मंजूर करण्यासाठी बाह्य वित्तीय संस्थांकडून आर्थिक मदत घेण्याबाबत प्रयत्न करावे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

